बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकः बाळासाहेब मस्के

बीड | बुधवार, दि. १७ जुलै २०२४ | वर्ष ३रे | अंक ३५३वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

## राज्यस्तरीय समाज भुषण पुरस्कार


धारुरः अहमदनगर येथील माऊली संकुलन सभागृह येथे क्रुषी दिनाचे औचित्य साधून गेवराई तालुक्यातील गढी येथील सामाजिक कार्यकर्ते ग्रामपंचायत सरपंच विकास समिती प्रदेश उपाध्यक्ष तथा महाराष्ट्र ग्रामपंचायत कर्मचारी महासंघाचे गेवराई तालुकाध्यक्ष पत्रकार सखाराम पोहिकर यांना सरपंच सेवा संघाच्या वतीने राज्यस्तरीय समाज भुषण पुरस्काराने सन्मानपत्र सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आल्याबद्दल महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी महासंघाच्या वतीने धारुर या ठिकाणी सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला यावेळी तालुकाध्यक्ष मा. सिध्दार्थ देशमाने उपाध्यक्ष साळीकराम करे अशोक खांडेकर सचिव महारुद्र मुंडे सहसचिव ज्ञानेश्वर भारती सदस्य इंद्रान कुरकटे जीजाराम सरवदे बाबुराव शिंदे बाबुराव शिंदे शिवरत्न बनसोडे प्रदीप मुंडे कलीम शेख आयुब शेख निलेश मस्के भागवत बडे शिवाजी कांबळे परमेश्वर बडे इत्यादी उपस्थित होते.

प्रकाश आंबेडकर यांनी जाहीर केला निर्णय

### एसी, एसटी अन् ओबीसींच्या आरक्षण हक्कासाठी

# आरक्षण बचाव यात्रा

- श्रीमंत मराठ्यांनी ओबीसी विरुद्ध मराठा वाद लावला
- औरंगाबादमध्ये होणार आरक्षण बचाव यात्रेची सांगता
- सरकार आणखीन कोंडीत सापडण्याचे संकेत?
- या दिवशी शाहू महाराजांनी आरक्षणाची घोषणा केली




औरंगाबाद/पुण्यभूमी प्रतिनिधी

वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी एक महत्त्वाची माहिती जारी केली होती. त्यामुळे काल संध्याकाळी ४ वाजता पत्रकार परिषद घेऊन मोठा निर्णय जाहीर करणार, असं त्यांनी जाहीर केलं होतं. त्यानुसार प्रकाश आंबेडकर यांनी आपला मोठा निर्णय जाहीर केला आहे. प्रकाश आंबेडकर राज्यात आता एससी, एसटी, ओबीसींच्या हक्कासाठी आरक्षण बचाव यात्रा काढणार आहेत. या यात्रेला २५ जुलैला दादर चैत्यभूमी इथून सुरुवात होणार आहे. छत्रपती संभाजीनगरमधील सुभेदारी शासकीय विश्रामगृहावर आयोजित पत्रकार परिषदेतून त्यांनी आरक्षण बचाव यात्रा काढण्यात येणार असल्याचं म्हटलं आहे.

आरक्षण बचाव यात्रा ही यात्रा कोल्हापूर, सांगली, सोलापूर, उस्मानाबाद, बीड, लातूर, नांदेड, यवतमाळ, अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशिम, जालन्याला जाईल. यानंतर ७ किंवा ८ ऑगस्टला तारखेला या यात्रेची छत्रपती संभाजीनगर येथे सांगता होईल, अशी माहिती प्रकाश आंबेडकर यांनी दिली आहे. काही लोक नामांतराची आठवण करून देत आहेत. दोन गट पडले आहेत. पुरोगामी महाराष्ट्राच्या दृष्टीने ओबीसी विरुद्ध मराठा असा वाद श्रीमंत मराठ्यांनी लावला आहे. काय स्वरुप होईल याची भीती अनेक ओबीसी संघटना आणि नेत्यांना आहे. जरांगे पाटील यांनी आपलं आंदोलनाची सुरुवात केली आहे. दुसऱ्याबाजूला मुख्यमंत्र्यांनी सर्व पक्षीय बैठक बोलावली होती. त्या बैठकीला सर्व मराठा नेते एनसीपीचे, काँग्रेसचे आणि शिवसेना ठाकरे गटाचे उपस्थित नव्हते. त्यामुळे त्या बैठकीत राजकीय पक्षांची भूमिका काय? हा प्रश्न वंचित बहुजन आघाडीकडून विचारण्यात आला. यात सामंजस्याचा तोडगा काढायचा पान २ वर...




### आरक्षण बचाव यात्रेबद्दल काय म्हणाले?

हे लोण आता फक्त मराठवाड्यापुरतं मर्यादित आहे असं मानत नाही. ते पश्चिम महाराष्ट्र आणि खान्देश हळूहळू पसरत चाललं आहे. कदाचित विदर्भातील वाशिम जिल्हा आणि बुलढाण्याचा काही भाग इफेक्ट होण्याची शक्यता आहे. या सर्व ओबीसी संघटना होत्या, त्यांची मागणी होती की वंचित जी भूमिका मांडतंय ती गावोगाव गेली पाहिजे. त्यामुळे पक्षाने असं ठरवलंय की या सामाजिक संघटनांना घेऊन २५ तारखेला दादर चैत्यभूमी इथून सुरुवात करायची. त्याच दिवशी फुलेवाड्यात जायचं पुण्यात आणि २६ तारखेला सकाळी २६ जुलै ही महत्त्वाची तारीख आहे. या दिवशी शाहू महाराजांनी आरक्षणाची घोषणा केली होती. त्यामुळे शाहू महाराजांसमोर नतमस्तक होऊन आरक्षण बचाव जन यात्रा काढणार आहे. ही यात्रा कोल्हापूर, सांगली, सोलापूर, उस्मानाबाद, बीड, लातूर, नांदेड, यवतमाळ, अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशिम, जालन्याला जाईल. ७ किंवा ८ऑगस्टला तारखेला औरंगाबादमध्ये सांगता होईल, अशी माहिती प्रकाश आंबेडकर यांनी दिली.

### यात्रेतील प्रमुख मागण्या

ओबीसींच्या आरक्षण वाचलं पाहिजे, एससी एसटी विद्यार्थ्यांची स्कॉलरशिप डबल झाली पाहिजे, ओबीसीच्या विद्यार्थ्यांना सुद्धा एससी एसटीची स्कॉलरशिप तशीच्या तशी लागू झाली पाहिजे, घाई गर्दीमध्ये कास्ट फॉर्म इशू करण्यात आला आहे, तो रद्द करण्यात यावा, जे कुणबी आहेत त्यांना आरक्षण मिळणारच, आरक्षणात एससी एसटी आणि ओबीसींना पदोन्नती मिळाली पाहिजे. या प्रमुख मागण्या असणार आहेत.

## डोळ्यांच्या रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया

नियोजन : धनंजय मुंडेंच्या वाढदिवसानिमित्त डॉ.योगेश क्षीरसागरांचा उपक्रम





बीड /पुण्यभूमी प्रतिनिधी

कृषिमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर व कल्पतरूच्या सचिव डॉ.सारिका क्षीरसागर यांच्या पुढाकारातून डोळ्यांच्या रुग्णांवर उपचार करण्यात येणार आहेत. क्षीरसागरांच्या दूर'दृष्टी' नियोजनामुळे अनेक रुग्णांना चष्म्याची गरजही भासणार नसून या अभिनव उपक्रमाचे सर्वस्तरातून कौतूक करण्यात येत आहे.

कृषिमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यात अनेक सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. बीडमध्ये डॉ.योगेश आणि डॉ.सारिका क्षीरसागर यांच्या पुढाकारातून चष्मा असलेल्या रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. यामुळे रुग्णांना परत चष्मा पान २ वर...

## परळीच्या विकासासाठी घेतला निर्णय!

पक्षांतर : राजेभाऊ फडांचा शरद पवार गटात प्रवेश

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी विधानसभा मतदार संघाचा केवळ कागदावर होत असलेला विकास प्रत्यक्षात उतरुन बारामतीच्या धर्तीवर सर्वांगीण विकास साधण्यासाठी परळी मतदार संघाचे युवा नेतृत्व राजेभाऊ फड देशाचे माजी कृषीमंत्री शरदचंद्र पवार यांच्या कंपुमध्ये दाखल झाले असुन लवकरच त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात जाहिर प्रवेश होणार असल्याने परळी विधानसभा मतदार संघातील राजकिय समिकरणे झपाट्याने बदलणार आहेत.

परळी तालुक्यातील मोठ्या ग्रामपंचायती पैकी एक असलेली कन्हेरवाडी ग्रामपंचायत वीस वर्षांपासुन ताब्यात असलेले, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक, सेवा सहकारी सोसायटीचे व्हाईस चेअरमन म्हणुन राजेभाऊ फड यांचे कार्य परळी मतदार संघाला परिचित आहे. स्वच्छ प्रतिमा व युवा उद्योजक म्हणुन युवक वर्गात वेगळी क्रेझ असलेल्या



राजेभाऊ फड यांनी रासपाच्या युवा प्रदेशाध्यक्ष पदावरुन महाराष्ट्रात छाप सोडली आहे. कार्यकर्त्यांकडुन परळी विधानसभा लढवण्याचा होत असलेला आग्रह व परळी विधानसभा मतदार संघात आत्तापर्यंत केवळ कागदावरच विकास होत प्रत्यक्षात विकासापासुन कोसो दुर असलेल्या जनतेला परळीचे विकसित रुप दाखवण्याचे ध्येय घेवुन आपण परळी विधानसभा मतदार पान २ वर...

## केज शहरात मिळणार चार रोहित्र

दिलासा : खा.बजरंग सोनवणेंच्या पाठपुराव्याला यश !



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज शहरातील वारंवारित खंडित होणारा वीज पुरवठा व कमी दाबाने कमी दाबाने होणारा विद्युत पुरवठा या नागरिकांच्या समस्यांची दखल खा. बजरंग सोनवणे यांनी घेऊन वीज वितरणचे अधिकाऱ्यांना नवीन उच्च क्षमतेच्या चार रोहीत्राचा प्रस्ताव तयार करून मंजूरीसाठी पाठविण्याचे कळविले आहे. केज शहरातील शिक्षक कॉलनी, अहिल्या नगर, सब स्टेशन आणि दूध डेअरी या भागात अत्यंत कमी दाबाने वीज पुरवठा होत आहे तसेच तो वारंवार खंडित होत असल्याने या भागातील नागरिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत होते. दरम्यान या भागातील नागरिकांनी खासदार बजरंग सोनवणे यांची भेट घेऊन ही समस्या सोडवण्याची मागणी केली. त्यानुसार खा. बजरंग सोनवणे याची तात्काळ दखल घेत विज वितरण विभागाशी संपर्क साधून पान २ वर...

## महामॅरेथॉन स्पर्धेला पावसातही प्रतिसाद!

उपक्रम | धनंजय मुंडेंच्या वाढदिवसानिमित्त स्पर्धा

परळी पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्याचे कृषीमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या १५ जुलै ता जन्मदिनाचे औचित्य साधून राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या महामॅरेथॉन स्पर्धेत परळीकरांनी अक्षरशः पडत्या पावसात मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.

परळीसह बीड जिल्ह्यातुन तसेच कोल्हापूर, सांगली, जालना, नांदेड, नंदूरबार एवढेच नाही तर कर्नाटक आणि हरियाणा राज्यातून देखील शेकडो स्पर्धक 'ग्रीन परळी-क्लीन परळी' हा संदेश देत या स्पर्धेत सहभागी झाले होते. स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्यास उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, तहसीलदार व्यंकटेश मुंडे, गुन्हे शाखेचे बीड जिल्हा पोलिस निरीक्षक उस्मान शेख, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुजितसिंह पवार, प्रदेश उपाध्यक्ष तुळशीराम



पवार, तालुकाध्यक्ष वैजनाथ सोळंके, ज्येष्ठ नेते प्रा.मधुकर आघाव, गट शिक्षण विस्तार अधिकारी अन्सारी मॅडम यांसह मान्यवर उपस्थित होते. भर पावसात उत्साहात स्पर्धा पार पडली डी.जे.च्या तालावर देशभक्तीपर गीते आणि प्रेरणादायी गीतांवर स्पर्धकांनी ठेका धरला. ज्येष्ठ पान २ वर...

### यांना मिळाले पारितोषिक

खुला गट प्रथम-अभिषेक कामन्ना देवकते (कोल्हापूर), द्वितीय-अभिनंदन दिपक सूर्यवंशी (सांगली), तृतीय-अरुण धनसिंग राठोड, ज्येष्ठ नागरिक गट प्रथम-रविंद्र सूर्यभान पाटील (सोलापूर), द्वितीय-केशव माणिकराव मोटे (रेणापूर), तृतीय-शेख उस्मान चांद (बीड ), महिला गट प्रथम- भारती कुमारी (हरियाणा), द्वितीय - रिंकी धन्य पांवरा (नंदुरबार), तृतीय- प्रणाली संजय शेगावकर (शेगाव), शालेय गट प्रथम- भावेश कुमार, द्वितीय -आवेश चव्हाण (कोल्हापूर), तृतीय-प्रणव दिलीप राठोड, उत्तेजनार्थ-बिरुदेव शहाजी कोळेकर उत्तेजनार्थ- गोविंद यांनी पारितोषिक पटकावले.

## मृत्यू नंतरही आईचं कायम स्मरण

कौतुकास्पद : रक्षा सावडणे कार्यक्रमात केले वृक्षारोपण

सोमेश्वर सोनटक्के/तेलगाव

सर्व स्तरातील समाजामधील अनेक उच्चशिक्षित लोक सुद्धा कालबाह्य विचाराला थारा देतात ही वस्तुस्थिती असताना कांहीं जन शिक्षण घेऊन खरे वास्तववादी चित्र जगासमोर आणतात.पूर्वी गावापासून दूर राहून आपली गुजराण करणाऱ्या बंजारा समाजातील शिकून सावरून मोठे झाले पण जुन्या काळातील विचाराला फाटा फाटा देत नवीन पर्वाला सुरुवात होत असल्याचं सकारात्मक चित्र दिसून येत आहे.विद्रोही विचारवंत आयु.हनुमंतराव उपरे काका यांच्या समवेत तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या विचाराच्या बौद्ध धर्माचा स्वीकार करून बंजारा समाजात आदर्श रुजविला.शिक्षक ते वकिलीचा उच्च शिक्षण ग्रहण करणाऱ्या ॲड.मोहन राठोड यांनी बोले तैसा चाले या उक्तीला शोभेल असे कृतीतून कार्य करून दाखविल्याने बंजारा समाजातील अनेकांच्या भुवया उंचावल्या.त्याचे असे झाले की लोणवळ तांडा तालुका वडवणी



येथील शारदाबाई दक्षिण राठोड यांचे अल्पशा आजाराने निधन झाले होते त्यांच्या जाण्याने राठोड कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. रक्षा सावडून ती गंगेत टाकण्याची प्रथा आहे परंतु त्यामुळे गंगेचं पावित्र धोक्यात येते. आई जगात नसली तरी तिचं स्मरण कायम राहावं यासाठी वृक्षाच्या माध्यमातून आईच्या प्रेमळ छायेचा सुगंध हमेशा दरवळत रहावा तसेच या निमित्ताने समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन रुजला जावा पान २ वर...

# वाजवा रे वाजवा!

ब्रि आमचे येथे श्रीकृपेकरून अमुक अमुक यांचे सुपुत्र आणि अमुक अमुक यांची सुकन्या यांचा शरीरसंबंध करण्याचे योजिले आहे. तरी मांडवशोभेसाठी आपण अवश्य यावे' अशी कोणे एके काळची आपल्या वाडवडिलांच्या लग्नाची इतकी थेट पत्रिका धनाजीरावांच्या डोळ्यासमोरून हलत नव्हती. शरीरसंबंध मांडवशोभा छ्या हे म्हणजे फारच झाले. लग्न म्हणजे स्वर्गात बांधल्या जाणाऱ्या पवित्र गाठी, त्या पृथ्वीवर येऊन पक्क्या करायच्या असतात. त्याआधी दोन्ही घराणी किती तोलामोलाची आहेत, हे पाहायचे असते. लग्न म्हणजे दागदागिने, कपडेलत्ते, मेजवान्या, भेटवस्तू, नाचगाणी, भेटीगाठी हेच त्यांना माहीत होते. आपल्या आजोबा–पणजोबांच्या जीवनात जरा म्हणून मनोरंजन नव्हते, म्हणून त्यांनी अशा थेट आणि रूक्ष पत्रिका लिहून लग्ने उरकली. आपण आपल्या धाकट्याच्या बाबतीत मात्र तसे अजिबात करायचे नाही, असे धनाजीरावांनी ठरवून टाकले होते. त्याला कारणही तसेच होते. हे कारण काय आणि हे धनाजीराव कोण म्हणून विचारता? अहो तेच ते. कोणे एके काळच्या आटपाट नगरातले. नाही समजले? पहिल्यापासून नीटच सांगायला हवे आहे म्हणता? चला तर मग काय झाले की पूर्वीच्या कहाण्यामध्ये असते तसे एक आटपाट नगर होते. तिथे धनाजीराव आणि सुंदराबाई हे जोडपे राहत होते. आणि हो, या आटपाट नगरात धनाजीरावांच्या गावीही नसलेले एक नानाजीपंतही होते. पण आपणही त्यांची फार दखल घेण्याची गरज नाही. तर असो, गाठीला बक्कळ पैसा जोडलेल्या धनाजीरावांना गावात चांगलाच मान होता. त्यांचे कुटुंबही खाऊनपिऊन सुखी होते. धनाजीरावांच्या दोन गुणी मुलांचे विवाह झाले होते आणि त्यांच्या कुटुंबात एक सुशील सून आणि जावयाची भर पडली होती. आता त्यांच्या शेंडेफळाचे लग्न होऊ घातले होते. धनाजीरावांच्या घरातले हे शेवटचे कार्य. त्यामुळे सगळ्या पंचक्रोशीत त्याची चर्चा झाली पाहिजे, 'आजवर असा विवाह पाहिला नाही,' असे लोकांनी म्हटले पाहिजे असे धनाजीरावांना वाटत होते. शिवाय त्यांच्या असेही लक्षात आले की त्यांच्याकडे असलेल्या संपत्तीच्या, त्यांच्या उत्पन्नाच्या तुलनेत आटपाट नगरात महागाई अगदीच किरकोळ होती. त्यामुळे मग धनाजीराव आणि सुंदराबाई यांनी हा समारंभ झोकात, अगदी हात सैल सोडून करायचे ठरवले. धनाजीरावांच्या घरच्या कार्यात अगदी तूप वाढण्यापासून प्रत्येक गोष्टीसाठी नाचानाच करणाऱ्या वऱ्हाडी मंडळींविषयी काय सांगावे? पंचक्रोशीमधली सगळी बडी बडी मंडळी सहकुटुंब झाडून हजर झाली होती. धनाजीरावांनी आपल्याला बोलावले, आपण त्यांच्या आमंत्रितांच्या यादीत आहोत, एवढ्या एका गोष्टीमुळेच आपण कृतकृत्य झालो आहोत, असे त्यांना वाटत होते आणि ते धनाजीरावांना जाणवावे असेच त्यांचे वागणे होते. एरवी आपल्याला कस्पटासमान लेखत आपल्यासमोर मोठा तोरा मिरवणारी, नाक वर करून चालणारी ही सगळी मंडळी धनाजीरावांसमोर कशी लीन होताहेत हे नानाजीपंत डोळे विस्फारून बघत होते. अर्थात गेल्या महिनाभरात कपडे असोत, धान्यधुन्य असो की औषधे असोत, या सगळ्यांच्या खरेदीसाठी गावात असलेल्या धनाजीपंतांच्या दुकानांमधले भाव ज्या वेगाने वाढले होते, त्यामुळे नानाजीपंतांचे डोळे यापेक्षाही जास्त विस्फारले गेले होते, ही गोष्ट वेगळी.अखेर धनाजीरावांच्या धाकट्या लेकाचे लग्न लागले. अगदी त्यांना आणि सुंदराबाईंना हवे होते तसे लागले. एवढा खर्च करूनही धनाजीरावांचा खिसा जडच राहिला. कारण तेवढी महागाईच नव्हती त्यांच्या जगात. आता त्या दोघांपुढे प्रचंड मोठे रिकामपण दाटून आले आहे. त्या रिकामपणाचे करायचे काय हा प्रश्न होम थिएटरवर साखरपुडा वा लग्नाची दृश्ये पाहून काही काळापुरता सुटेलही पण त्यानंतर काही ना काही समारंभ करावाच लागेल तोही वाजतगाजत तिकडे नानाजीपंतांनीही आता, भाच्याचे लग्नही इतक्याच थाटात करायचे असा हट्ट त्यांच्या बहिणीकडे धरला आहे म्हणतात.

# धनंजय मुंडे - शेतकऱ्यांच्या विकासाचे मंत्री नव्हे मंत्र!

धनंजय मुंडे हे नाव घेतलं की सगळ्यात अगोदर डोळ्यासमोर त्यांचं रुबाबदार व्यक्तिमत्व, त्यांचं बहारदार व खास शैलीतील वक्तृत्व आणि त्यांचे विकासाभिमुख नेतृत्व या बाबी सर्वांच्या लक्षात येतात. अनेक वर्ष संघर्षात घालवल्यानंतर प्रथमच सत्तेत आल्यावर धनंजय मुंडे यांनी सुमारे अडीच वर्षे सामाजिक न्याय विभागाचा पदभार सांभाळला. त्यावेळी ३२ नंबरचे समजले जाणारे सामाजिक न्याय हे खाते मी एवढे प्रतिष्ठित करून दाखवेल की स्वतः राज्याचे मुख्यमंत्री हे खातं स्वतःकडे ठेवतील असं जाहीरपणे आमचे साहेब म्हणाले आणि पुढील अडीच वर्षात त्यांनी ते करूनच दाखवलं! महायुतीच्या सरकारमध्ये मुंडे साहेबांकडे कृषी खाते आले. शेतकऱ्यांवर सातत्याने येणारी नैसर्गिक संकटे आणि नैसर्गिक असमतोल यामुळे नेहमीच कृषिमंत्री हे टीकेचे धनी असतात. मात्र संकटांना विरोधातपणे कसे सामोरे जायचे आणि त्यातून प्रगती आणि विकासाचा नवा मार्ग कसा शोधायचा हे 'मुंडे' यांना चांगले जमते.






अलीकडच्या काळात मुंडे साहेब कृषी मंत्री झाल्यापासून पीएम किसान सारखी शेतकऱ्यांना थेट अर्थ सहाय्य देणारी योजना दुप्पट करून राज्य सरकारच्या माध्यमातून चालवणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे. त्याचबरोबर केवळ एक रुपया भरून शेतकऱ्यांना विमा भरता येईल असेही महाराष्ट्र देशातील एकमेव राज्य आहे हे स्वतः केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान साहेब यांनी दोन दिवसांपूर्वी दिल्लीत जाहीरपणे सांगितले. आत्ता काही दिवसांपूर्वीच हळदीच्या शेतात कोळपणी करताना बैलांच्या ऐवजी घरातील सदस्यांना जुंपलेल्या हिंगोली जिल्ह्यातील एका शेतकऱ्याचा व्हिडिओ समोर आला आणि त्याच्या दुसऱ्या दिवशी धनंजय मुंडे साहेबांची माणसं त्या शेतकऱ्याच्या दारात बैलांची जोडी घेऊन पोहोचले. हे राज्यात वेगवेगळ्या माध्यमांच्या बातम्यांमधून सर्वांनीच पाहिले! शेतकऱ्यांच्या प्रति इतकं संवेदनशील असणार हे नेतृत्व, शेतकऱ्यांच्या प्रगती आणि आर्थिक उन्नतीचे कायम ध्येय उराशी बाळगून काम करत असते.देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनला त्याचबरोबरीने आता दाळी आणि अन्य कडधान्यांच्या बाबतीत सुद्धा देश शंभर टक्के स्वयंपूर्ण बनला आहे आणि यामध्ये मागील एक वर्षांमध्ये सर्वात मोठा वाटा महाराष्ट्राचा आहे हे सुद्धा मुंडे साहेबांच्या टीम मध्ये काम करणारा एक सहकारी म्हणून मला अभिमानाने सांगावे वाटते.आज चॅट जीपीटी, आर्टिफिशियल इंटेलिजन्स अशा आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून नवनवीन तंत्रज्ञान अवलंबून देश जागतिक महासत्तेकडे वाटचाल करत असताना या देशातला शेतकरी सुद्धा बरोबरीने या प्रगतीच्या रथात बसला पाहिजे या दृष्टीने प्रत्येक निर्णय घेताना शेतीमध्ये सुद्धा आता ड्रोन ने फवारणी करावी, शेतात कोणतेही पिक घेण्या अगोदर त्या मातीचे परीक्षण केले जावे, त्याचबरोबर मातीचा असलेला पोत बघूनच त्याप्रमाणे कोणते पीक घ्यायचे हे ठरवले पाहिजे, यांसारख्या बारीक परंतु अत्यंत महत्त्वाच्या संशोधनाला धनंजय मुंडे हे कृषिमंत्री म्हणून प्राधान्य देत आहेत.

अनेक जुन्या योजनांना नाविन्यपूर्ण रूप देऊन तसेच आणखी नव्या विविध योजना आखून त्या खऱ्या गरजू लाभार्थ्यांपर्यंत पोहोचतील या दृष्टीने देखील बारकाईने नियोजन ते करतात. जगाच्या पाठीवर आर्टिफिशियल इंटेलिजन्स चा वापर करून माती पासून ते सूर्यकिरणांपर्यंत विविध नैसर्गिक बाबींचा शेतीच्या उत्पादनात भर टाकण्यासाठी कसा वापर केला जाईल यासाठीचे विशेष संशोधन सुद्धा कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वात राज्य शासनामार्फत हाती घेण्यात आले आहे. स्वतः जन्माने मराठवाड्यातील जरी असले तरी मराठवाडा जितका प्रिय आहे तितकाच विदर्भ तितकेच कोकण आणि तितकाच संपूर्ण महाराष्ट्र या पद्धतीने केवळ आणि केवळ आपल्या खात्याचा शेवटचा शेतकरी सुद्धा लाभार्थी ठरला पाहिजे या दृष्टीने काम करणारे धनंजय मुंडे हे शेतकऱ्यांच्या विकासाचे मंत्री नव्हे तर शेतकऱ्यांच्या विकासाचा मंत्र ठरतील आणि कृषी खात्याची सुद्धा आणखी प्रतिष्ठा वाढवली जाईल असा विश्वास मला आहे. शेतकऱ्यांच्यासाठी काम करत असताना कोणताही भेदभाव उराशी न बाळगता कायमच जे करायचे ते अगदी मनापासून अशी भूमिका ठेवून काम करणाऱ्या माझ्या साहेबांना जन्मदिनाच्या निमित्ताने खूप खूप शुभेच्छा!

–प्रशांत भास्करराव जोशी

# नाल्याच्या पूरात अडकली २५० नागरिक

## निसर्ग : पळसखेडा येथील घटना



सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

गावालगत असलेल्या पळसखेडा येथील लेंडी नाल्याला सायंकाळी सहा वाजेपासून पूर आल्या मुळे रात्री साडे आठ वाजेपर्यंत या नाल्याच्या पूरात दोन्ही बाजूंनी दोनशे ते अडीचशे लोक अडकल्या ची घटना रात्री साडे आठ वाजता पळसखेडा गावाजवळ उघड झाली आहे दरम्यान या पुलाचे काम अर्धवट झाल्या ने सोमवारी रात्रीं नागरिकावर ही वेळ आली आहे

सोयगाव परिसरात झालेल्या मुसळधार पावसाने पळसखेडा गावाजवळ असलेल्या स्मशानभूमीच्या लेंडी नाल्याला मोठा पूर आला होता परंतु पुराचे पाणी काही करता कमी होईना त्यामुळे दोन्ही बाजूंनी दोनशे ते अडीचशे लोक पुरात अडकून अंधारात उभी होती दरम्यान या नाल्यावर नलकांडी पूल मंजूर झालेला आहे परंतु संबंधित ठेकेदार ने या पुलाचे काम अर्धवट करून मंजूर कामाचे फलक काढून गाशा गुंडाळला आहे त्यामुळे नाल्याच्या पुरातून शेत मजुरांसह अडीच शे लोक अडकून उभी होती रात्री नऊ वाजेपर्यंत ही नाल्याच्या पूरचे पाणी कमी झाले नव्हते

## पान एक वरून

**एसी, एसटी अन्...**

असेल तर श्रीमंत मराठ्यांचे पक्ष आहेत. त्यात एनसीपी आहे, काँग्रेस आहे, भाजप आहे आणि उद्धव ठाकरे गट आहे. हे जोपर्यंत भूमिका मांडत नाहीत, तोपर्यंत तोडगा निघणार नाही, असं प्रकाश आंबेडकर म्हणाले.सऱ्या बाजूला या बैठकीत मुख्यमंत्र्यांना वंचितकडून विनंती करण्यात आली होती. मुख्यमंत्र्यांनी या राजकीय पक्षाच्या नेत्यांना व्यक्तिगत पत्र लिहावं. या प्रश्नावर म्हणजे जरांगे यांची जी मागणी आहे, मराठ्यांना ओबीसीच्या कोट्यातून आरक्षण द्या ही मागणी आहे, त्याबाबत राजकीय पक्षांची भूमिका काय आहे, त्याची विचारणा करून मग समान तोडगा काढता येईल. त्या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिलं की पत्र पाठवू. अजून पर्यंत वंचित आघाडीला ते पत्र मिळालं नाही. इतर पक्षांना मिळालं का याचा आमच्याकडे खुलासा नाही, असं प्रकाश आंबेडकर म्हणाले.

**मृत्यू नंतरही आईचं...**

व इतरांनी बोध घ्यावा या दृष्टीनं बंजारा समाजात चांगल्या प्रथेचा पायंडा पडला.या कार्यक्रमाला सरपंच नरेंद राठोड,बबनराव पवार,भाऊसाहेब पवार,लहुजी विद्रोही सेनेचे संस्थापक अध्यक्ष भास्कर नाना शिंदे,सुभाष कांबळे, चर्मकार विकास विकास संघटनेचे अध्यक्ष राजेश जाधव,सर्जेराव राठोड,रुद्रप्रताप राठोड आदी उपस्थित होते.

**महामॅरेथॉन स्पर्धेला...**

नागरिक गटातील विजेत्या स्पर्धेकांच्या हाताने ना.धनंजय मुंडे यांचा वाढदिवसाचा केक कापला गेला, हरीत परळी... स्वच्छ परळी हा संदेश देण्याच्या उद्देशाने स्पर्धा आयोजित केली गेली होती. सहभागी प्रत्येकाला वृक्ष व प्रविण्य प्रमाणपत्र देण्यात आले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी व सहकारी आणि परळी तालुका शारीरिक शिक्षक संघटनेचे अध्यक्ष एस.पी. मुंडे सर व सर्व क्रीडा शिक्षक यांनी परिश्रम घेतले.

**केज शहरात मिळणार चार...**

फ्या भागातील समस्या सोडविण्यासाठी २०० के व्ही क्षमतेचे चार विद्युत रोहितत्राचे प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाला पाठविले आहेत. लवकरच चार नवीन रोहित मिळणार असल्याने या भागातील नागरिकांची विजेची समस्या कायमची सुटणार आहे.

**डोळ्यांच्या रुग्णांवर मोफत...**

लावण्याची गरज भासणार नसून १५ ते २२ जुलै या कालावधीत नाव नोंदणी करणे गरजेचे आहे. यासाठी आधार कार्ड, राशन कार्ड लागणार असून १८ ते ४० वर्ष वयोगट यासाठी निश्चित करण्यात आला आहे. नाव नोंदणी अथवा अधिक माहितीसाठी ९९२३८४७६६०, ८२०८९०७७५१ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले असून याचा अधिकाधिक रूग्णांनी लाभ घ्यावा, असे डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिका क्षीरसागर यांनी म्हटले आहे.

**परळीच्या विकासासाठी...**

संघातुन निवडणुक लढवणार असल्याचे जाहिर केल्यानंतर राजेभाऊ फड यांच्या महाविकास आघाडीच्या नेत्यांशी गाठी भेटी वाढल्या.परळी विधानसभा मतदार संघात देशाचे माजी कृषीमंत्री शरदचंद्र पवार यांना मानणारा मोठा वर्ग असुन याचा प्रत्यय प्रत्येक निवडणुकीत आलेला आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पाटोले,राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटिल आदी नेत्यांच्या भेटीनंतर परळी मतदार संघाचे हे युवानेतृत्व शरदचंद्र पवार यांच्या कंपुमध्ये दाखल होत असल्याने परळी विधानसभा मतदार संघाची निवडणुक रंगतदार होणार आहे. युवा नेते राजेभाऊ फड यांचा लवकरच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात जाहिर प्रवेश होणार असल्याने परळी विधानसभा मतदार संघातील जनतेमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## पान सहा वरून

**मुस्लिमांनो,फक्त मतं देणारे...**

मात्र विधान परिषदेत एकही मुस्लिम आमदार समाजाचे प्रतिनिधित्व करायला उरला नाही. ही परिस्थिती अत्यंत चिंतनीय व शोचनीय आहे. लोकशाहीच्या दोन्ही भावनांमध्ये जर समाजाचे प्रतिनिधित्व करणारे खासदार, आमदार योग्य संख्येत नसतील तर ही बाब अत्यंत काळजी करावी अशीच आहे. यासाठी एआयएमआयएम पक्षाने मुस्लिम समाजासह दलित आणि तळागाळातील समाजांना न्याय देण्याकरिता संसदेत तसेच विधान भवनात समाजातील नेतृत्वाला पुढे आणण्याची तसेच समाजानेही एआयएमआयएम पक्ष आणि नेतृत्वाला साथ देण्याची गरज आहे. असा एक सूर जवळपास सर्वच पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी वरिष्ठांसमोर मांडला.

**बीड जिल्ह्यातील सर्व जागा लढविणार: शेख शफिक**

: महाराष्ट्रात सत्ताधारी आणि विरोधी दोन्हीकडे जे पक्ष आहेत ते तुकड्या तुकड्यात विभागले गेले आहेत. सत्तापक्षात जे आहेत त्यांचेच दुसरे तुकडे विरोधी पक्षात आहेत. तुकडे करणारा भाजप हा एका तुकड्यासोबत सत्तेत आहे. जो काही काळापूर्वी दुसऱ्या तुकड्या सोबत होता. भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेस या चारही पक्षातील नेते सत्तेसाठी हपापलेले आहेत. यापैकी सत्तेसाठी कधी कोणता तुकडा कोणत्या तुकड्या सोबत आघाडी किंवा युती करेल हे स्वतः त्यांनाही सांगता येणार नाही. तेव्हा यांच्या नादी लागू नका. एआयएमआयएम पक्षा सोबत या. पक्षाचे हात बळकट करा. आगामी विधानसभा निवडणुकीत एआयएमआयएम पक्ष बीड जिल्ह्यातील सर्व जागा लढविणार आहे. तेव्हा जोमाने कामाला लागा.

**मंत्र्यासह आमदारांचे वेतन...**

पेन्शन बंद केली असताना मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री विविध खात्याचे मंत्री व आमदार यांना मात्र जुनी पेन्शन कायम चालू ठेवून त्यांच्या वेतन, भत्ते व पेन्शन मध्ये शेकडो पटीने वाढ करत त्यांना कोट्यावधी च्या सवलती दिल्या जात आहेत, अधिकारी – कर्मचारी यांच्या पेन्शन मुळे जर राज्याच्या तिजोरीवर बोजा निर्माण होत असेल तर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री सर्व मंत्री व आमदाराच्या वेतन भत्ते, पेन्शन मुळे राज्याच्या तिजोरीवर बोजा निर्माण होत नाही का ? असा सवाल विचारत जर शासन नवीन नोकर भरतीसाठी तिजोरीत पैसे नसल्याचे कारण सांगत असेल तर राज्यातील मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्यासह सर्वच मंत्री व आमदारांना लागू असलेले वेतन, भत्ते व पेन्शन बंद करून त्यांच्या वेतन, भत्ता सह पेन्शन वर होणारा खर्च नवीन नोकर भरतीच्या पगारासाठी वापरण्यात यावा अशी मागणी शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ड नारायण गोले पाटील यांनी दि.१६ जुलै रोजी निवेदनाद्वारे तहसीलदार यांच्यामार्फत मुख्यमंत्र्याकडे केली असून मागणी मान्य न झाल्यास शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देखील भाई ड.नारायण गोले पाटील यांनी निवेदनाद्वारे दिला आहे .

**संत रोहीदास महामंडळास...**

यांनी देखील बीड जिल्ह्यासाठी कायमस्वरूपी व्यवस्थापक देण्यासाठी तत्काळ प्रयत्न करू असे सांगितले.समाजातील सर्व गरजवंत उद्योगी बांधवाना विनंती आहे की, आपण आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून महामंडळाकडे रितसर कर्जासाठी अर्जदाखल करावेत असे आवाहन संत रोहिदास प्रतिष्ठाणाचे बीड जिल्हाध्यक्ष बाळासाहेब राऊत यांनी केले आहे.

**हित बाजुला ठेवून...**

आग्रही आहेत कुती समितीच्या वतीने श्रीरामपुर बंद करून शासनाचे लक्ष वेधण्यासाठी या पेक्षा मोठे आंदोलन उभे करण्याचे ठरवले आहे व्यवसायिकांनी मोठ्या प्रमाणात दुकाने बंद ठेऊन बंद ला उस्फूर्तपणे प्रतिसाद दिला या वेळी जैष्ठ पत्रकार मनोजकुमार आगे रिपाइं चे सुभाष त्रिभुवन मनसे चे बाबा शिंदे माजी आमदार भाऊसाहेब कांबळे अशोक उपाध्ये राहुल मुथा संजय शहा रियाज पठाण दत्तात्रय सानप मुक्तार शहा आण्णासाहेब डावखर लकी शेठी अशोक थोरे नागेश सावंत विजय कुरे यांच्या सह पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते यावेळी पो उनिरिक्षक सोळंकी यांनी चोख बंदोबस्त ठेवला

**महसूल कर्मचारी बेमुद्दत...**

आर. आर.आर. सिरसीकर, सोनवणे ए डी, दहीभाते एस. बी. भिंगुलवाड जी. एस., लोखंडे पी. पी., ठोंबरे आर. सी. यांच्यासह अनेक महसूल कर्मचाऱ्यांनी आंदोलनात सहभाग घेतला आहे. विशेष म्हणजे, महसूल कर्मचाऱ्यांच्या या आंदोलनामुळे ग्रामीण भागातील विविध योजना साठी येणाऱ्या लोकांची कार्यालयीन कामे प्रभावित झाली आहेत. यामुळे शासनाने या कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाची तातडीने दखल घ्यावी असी जनतेतूनही मागणी होत आहे. कारण या आंदोलनामुळे कामे ठप्प झाली आहेत. सध्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी सर्वसामान्य लोकांची तहसील कार्यालयात मोठी गर्दी असते परंतु या आंदोलनामुळे त्यांची मोठी अडचण निर्माण होत आहे म्हणून शासनाने वेळीच लक्ष घालून महसूल कर्मचारी यांच्या मागण्यांची दखल घेणं आवश्यक आहे..

**गेवराईत विठ्ठल नामाची..**

, फुगडी असे अनेक उपक्रम यावेळी घेण्यात आले. चिमुकल्यांनी विठुनामाचा जयघोष करत कार्यक्रमास उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे संचालक प्रा. गणेश गिरे, श्रीमती गीतांजली राख मॅडम, श्रीमती ललिता मेहता मॅडम, श्रीमती कचरे मॅडम यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. दरम्यान यावेळी आपल्या चिमुकल्यांचे कलागुण पाहण्यासाठी व प्रोत्साहन देण्यासाठी परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**मुंडेवाडीतील अवैद्य दारु...**

निर्माण करू शकतात. या दारू विक्री करणारांचे संबंधित यंत्रणेतील काही लोकांशी संबंध असल्यामुळे त्यांच्यावर कारवाया झाल्या तरी ते अवैधपणे पुन्हा अशा प्रकारे बेकायदेशीर दारू विक्री सुरुच ठेवतात. त्यामुळे पोलिसांनी याची दखल घेऊन या अवैध दारू विक्री करणाऱ्यावर तत्काळ कारवाई करून गावातील अवैध दारू विक्री बंद करण्याची मागणी महिलांनी भाजपचे नेते सुनील घोळवे यांच्या नेतृत्वाखाली केज पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक प्रशांत महाजन यांची भेट घेऊन लेखी निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनावर जयश्री घोळवे, नंदुबाई घोळवे, आशाबाई घोळवे, कमल घोळवे, पद्मिनाबाई मुंडे, पार्वती मुंडे, अश्विनी घोळवे, साखरबाई घोळवे, राधाबाई घोळवे, दीपाली घोळवे यांच्या सह्या व अंगठे आहेत.

**सोयगावसह सात गावांना...**

एकर शेती वाहून गेली आहे निंबायती शिवारात शिवदास राठोड गट न.२३. रोहिदास भासू राठोड हिरा भासू राठोड यांची तीन एकर शेती पुराचा पाण्यात वाहून गेली आहे दरम्यान याप्रकरणी महसूल आणि कृषी कडून मंगळवारी नुकसानीची पाहणी हाती घेण्यात आली आहे अद्याप नुकसानी चा प्राथमिक अंदाज समोर आला नाही सोयगाव शिवारात मका पिके आडवी झाली तर गलवाडा वेताळवाडी मधे पूरात पिके वाहुन गेली आहे त्यामुळे सोयगाव सह सात गावात खरिपाच्या पिकांना मोठा फटका बसला आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दूरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई–मेल–beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi news paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# करिअरच्या विविध संधी शोधाव्यात

**कार्यक्रम** पोलीस उपअधीक्षक धीरजकुमार यांचे मत

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

विद्यार्थ्यांनी फक्त डॉक्टर इंजिनियर न होता करिअरच्या इतर उपलब्ध संधींचा फायदा घ्यावा, असे आवाहन माजलगाव शहराचे सहायक पोलिस उप अधीक्षक बी. धीरजकुमार यांनी केले. येथील विद्याभवन शिक्षण प्रसारक मंडळाच्या सिंदफणा पब्लिक स्कूलच्या २२व्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. संस्थेचे अध्यक्ष प्रकाशदादा सोळंके आणि सचिव मंगलाताई सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली सोमवार, दिनांक १५ जुलै रोजी मोठ्या उत्साहात पार पडलेल्या या कार्यक्रमात फ्रान्समधील पूर्व प्राथमिक वर्गाच्या शिक्षिका निवेदिता रॉय, एचडीएफसी बँक माजलगाव शाखेचे शाखा व्यवस्थापक संतोष इंडे, प्राचार्य अन्वर शेख, उपप्राचार्य राहुल कदम उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शाळेच्या समन्वयक नीला देशमुख यांनी भूषविले.




विद्यार्थ्यांनी केवळ डॉक्टर इंजिनियर या पारंपरिक करिअर व्यतिरिक्त इतर करिअर संधी निवडावी तसेच शिक्षणाबरोबरच खेळाकडे देखील लक्ष देण्याचे आवाहन धीरज कुमार यांनी आपल्या भाषणात केले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात बोलताना शाळेचे प्राचार्य अन्वर शेख यांनी शाळेच्या आजच्या विस्ताराविषयी तसेच शाळेत सुरू असलेल्या उपक्रमाविषयी उपस्थितांना माहिती दिली. इयत्ता आठवी मधील गौरी पौळ व अभिनव विटेकर या विद्यार्थ्यांनी शाळेविषयी आपले मनोगत व्यक्त केले. शाळेत दहा वर्ष सेवा दिलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा यावेळी शाळेतर्फे सत्कार करण्यात आला. यामध्ये सुनीता बापमारे, सुचिता पांडे व वैशाली सोळंके या शिक्षकांचा समावेश होता. तसेच मुद्रिका सुरवसे, शकुंतला राऊत, छाया गायकवाड, चींगु काळे या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप शाळेच्या समन्वयक नीला देशमुख यांच्या भाषणाने झाला.

यावेळी शाळेच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीने सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आला. यामध्ये ' हम सब एसपीएस के बच्चे ' हे गीत तर 'बहादुर बच्चे ' हे नाटक सादर करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांवरील ताण तणाव दाखवणारी नृत्य रचना 'ऑल इज वेल' प्रस्तुत करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यश आगे व भक्ती गंगणे या विद्यार्थ्यांनी केले तर समिना शेख यांनी आभार मानले.

# बाळगोपाळांची वारकरी दिंडी सोहळा

**परंपरा :** विद्यार्थ्यांनी नोंदविला सहभाग



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक गावंदरा शाळेत बालगोपाळांचा दिंडी सोहळा, यामुळे संबंध गावात भक्तीमे वातावरण निर्माण झाले होते.

विठ्ठल रुक्मिणी च्या वेशभूषेत आणि वारकऱ्यांच्या टाळ गजरात शाळेपासून गावाबाहेरील महादेवाच्या मंदिरापर्यंत दिंडी काढण्यात आली. विठ्ठल ,विठ्ठल ,विठ्ठला ,हरी –ओम विठ्ठला ,तसेच राम –कृष्ण – हरी जय ,जय राम– कृष्ण– हरी या नामघोषाने परिसर दुमदुमून गेला होता. महादेवाच्या मंदिरात चिमुकल्या वारकऱ्यांनी टाळ वीणा यांच्यासह भक्तिमय अभंग गवळणी सादर केल्या त्यांच्या सोबतच गावातील शिक्षण प्रेमी माता – पालक ,पत्रकार यांनी ही दिंडीचा आनंद घेतला. माता–पालकांनी फुगड्या खेळून तसेच सर्व चिमुकल्या वारकऱ्यांनी फुगड्या चा आनंद घेतला. अभंगाच्या तालावर पाऊले खेळले , जणू ,पंढरपूर येथे अवतरले .नयनरम्य असा देखावा पाहायला मिळाला . या उपक्रमामुळे भारतीय संस्कृती व परंपरा यांचे संस्कार बालमनावर झाल्याशिवाय राहणार नाहीत. या साक्षरतेच्या वारीतून बालविवाह प्रतिबंध, नवसाक्षर भारत, शिक्षणाचे सार्वत्रिकरण, पर्यावरणाची जोपासना करणारे संदेश देण्यात आले. या दिंडीसोहळ्याचे सर्व ग्रामस्थांकडून कौतुक होत आहे.सर्व चिमुकल्या वारकऱ्यांना गोड खाऊचे वाटप करण्यात आले .या सोहळ्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री. दत्ता घोळवे,व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री.अरुण बडे तसेच श्री. विजयकुमार सिताप सर, श्री.बाबासाहेब चौधरी सर, श्री. रामेश्वर मुंडे, श्री. विशाल कदम, श्रीम. मीरा फरताडे, श्रीम.अनुराधा मोतेवार , श्रीम. जया घुगे – मुंडे यांचे सहकार्य लाभले.

# रस्त्याची झाली दयनीय अवस्था

**समस्या :** नागरिकांना होतेय गैरसोय



सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

वरठाण ते खडकदेवळा हद्द १२ की.मी रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली असुन पावसाळ्याचे दीवस असल्याने ठीकठीकाणच्या खड्ड्यात पाणी साचल्याने रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ता समजायला मार्गच नाही ह्या रस्त्याची कामे करण्यात यावी असे मागणी गेल्या कीत्येक दीवसापासुन सुरु आहे परंतु रस्त्याचे काम तर झालेच नाही परंतु खड्ड्याची डागडुजी करण्याची तसदी घेतली गेली नाही त्यामुळे रस्त्याचे भाग्य तरी कधी उजळणार ....

मराठवाडा खान्देशला जोडणारा बनोटी ते पाचोरा विस की.मी.असुन त्यातील वरठाण ते खडकदेवळा हद्द १२ की.मी. हा रस्ता मराठवाड्यात येतो तर पुढील रस्ता खान्देशमध्ये येतो ह्या दीवसभर वाहनांची वर्दळ असते त्यामधील बनोटी ते खडकदेवळा हद्द रस्त्त्याची अत्यंत दयनिय अवस्था झाली असुन ठीकठीकाणी मोठमोठे खड्डे पडलेले आहेत खड्यात रस्ता की रस्ता खड्डा समजायला मार्गच नाही ह्या रस्त्याची पुर्ण चाळणी झाली असुन साईटपट्या खोल गेलेल्या आहेत ह्या रस्त्यावर वाहणे चालविणे म्हणजे तारेवरची कसरत केल्यासारखे आहे दररोज ये जा करीत असलेल्या वाहनधारकांना मनक्याचे विकार जडलेले आहे खड्डा चुकविण्याच्या नादात अनेकवेळा दोन दुचाकी मध्ये अपघाताच्या घटना देखील घडलेल्या आहेत बारा की मी जाण्यासाठी एक तास लागत असतो अनेकवेळा गरोदर माता पाचोरा येथे घेऊन जात असताना रस्ता खराब मुळे रस्त्यामध्ये प्रसुती झाल्याच्या घटना देखील घडलेल्या आहेत ह्या रस्त्याचे डांबरीकरण काम व्हावे यासाठी अनेकवेळा रस्तारोको आंदोलन लेखी निवेदन देण्यात आली तसेच परंतु रस्त्याचे कामच झाले नाही.

ह्याच रस्तामधील खडकदेवळा हद्द ते पाचोरा खान्देश ह्या रस्त्याचे दोन वेळा डांबरीकरण झाले मग खन्देशमधील रस्त्याचे कामे होतात मग मराठवाड्यातील सोयगाव तालुक्यातील रस्त्याची कामे का होत नाही असा प्रश्न देखील नागरीकांना पडला आहे नुकतीच लोकसभा निवडणूक झाली असुन आता विधानसभा निवडणुकीत उतरण्यासाठी अनेक पुढारीचा मतदारसंघात भेटीगाठी करीत असुन बैठका घेऊन आश्वासनाची खैरात करीत करीत आहेत निवडणुका संपली की राजकीय पुढारीना ह्या रस्त्याचा कामाचा विसर पडत असतो परंतु गेल्या पाच वर्षांपासून वरठाण ते खडकदेवळा हद्द रस्त्याचे काम होत नसल्याने वरठाण बनोटी गोंदेगाव निभोरा परीसरातील जनता येत्या विधानसभा मतदानावरच बहीष्कार टाकण्याच्या पवित्रात दीसुन येत आहे

# आदिवासी भिल्ल समाजाच्या युवकास मारहाण

**कारवाई :** पोलीस ठाण्यात गुन्हा झाला दाखल

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

मौजे काकडहिरा येथील आदिवासी भिल्ल समाजाच्या पिराजी शहादेव बरडे यास आदिवासी भिल्ल समाजाचा असल्याने जातीवाचक शिवीगाळ करुन जिवे मारहाण केली त्यामुळे महादेव अप्पासाहेब बागलाने याच्या विरोधात पोलीस अधिक्षक बीड यांच्याकडे तक्रार देण्यात आली आहे तसेच यापुर्वी देखील पिराजी बरडे यास मारहाण केली होती परंतू राजकीय लोकांनी तक्रार दाखल होवू दिली नव्हती असे पिराजी बरडे यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे.



पुढे दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, पिराजी शहादेव बरडे हे आपल्या कुटूंबिय पत्नी, दोन मुल व मुलगी यांच्यासह काकडहिरा येथे राहत असून उसतोडी व मजुरी करुन काकडहिरा येथील गायरान जमीन मध्ये राहतात गेल्या काही दिवसापासुन गावातील महादेव अप्पासाहेब बागलाने नावाचा व्यक्ती आदिवासी भिल्ल समाजाचा असल्याने सतत गावात भेटेल तेथे जातीवाचक शिवीगाळ करणे, हाणमार करणे, तसेच दोन वेळा मी रस्त्याच्या कडेला उभा असताना मोटार सायकल अंगावर घालुन जखमी केलेले आहे. त्यानंतर पिराजी बरडे यांनी पोलीस स्टेशन बीड ग्रामीण येथे देखील जावून तेथे राजकीय लोकांना बोलावून बागलाने याने तक्रार दाखल होवू दिलेली नाही. त्यानंतर पण बागलाने याने पिराजी बरडे यांना त्रास देणे कमी केलेले नसुन वेळोवेळी मी गावात जेथे बसलेला अथवा कोणाशी बोलताना दिसलो तर तेथे येतो काय हिरो लय माजलास का तुला गावात रहायचे नाही का ? व घानेरड्या शिवीगाळ करणे, जातीवर बोलणे अंगावर थुंकणे, पिराजी बरडे यांच्या अंगावरचा रुमाल फेकून नाली मध्ये फ `कणे असे करतानाचा विडीओ व शिवीगाळ करतानाचे व्हिडीओ उपलब्ध आहेत ते पोलीस स्टेशनला देतो त्यामध्ये पिराजी यांना जिवे मारण्याची धमकी देतानाच सुध्दा व्हिडीओ आहे त्यामुळे महादेव अप्पासाहेब बागलाने यांच्याकडून पिराजी बरडे यांना व परिवाराच्या जिवितास धोका निर्माण झाला आहे.त्यामुळे पोलीस अधिक्षकांनी कार्यवाही करण्याची मागणी त्यांनी पोलीस तक्रारीद्वारे केली आहे.

# वेताळवाडी धरण झाले ओव्हरफ्लो

**अस्मानी :** नागरिकांना सतर्कतेचा दिला इशारा



सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगाव परिसरात झालेल्या अतिवृष्टीमुळे सोयगाव चे वेताळवाडी आणि जरंडीच्या धिंगपूर ही दोन धरणे मंगळवारी सकाळी सात वाजता ओव्हर फ्लो झाली आहे दरम्यान जरंडीच्या धिंगा पूर धरणातून सांडव्या द्वारे पाच से मी ने पाण्याचा विसर्ग करून विसर्ग केलेले पाणी सुकी नदीच्या पात्रात सोडण्यात आले आहे

अजिंठ्याच्या डोंगरावर सोमवारी रात्री झालेल्या सततच्या पावसाने धिंगापूर धरणात पाण्याची आवक वाढली होती त्यामुळे धरणाची पाणी पातळी धोक्या च्या बाहेर गेल्याने पाट बंधारे विभागाचे पथकाने मंगळवारी या धरणातून सांडव्या द्वारे पाच से मी ने विसर्ग केला आहे दरम्यान धिंगापर पाठोपाठ सोयगाव चे वेताळवाडी धरणं ही मंगळवारी सकाळी सात वाजता ओव्हर फ्लो झाले आहे त्यामुळे सोयगाव तालुक्यातील दोन धरणे एकाच पावसाने शंभर टक्क्यांनी भरली आहे

# विद्यार्थ्यांची वारकरी दिंडी उत्साहात

**परंपरा:** भोगलवाडी झेडपी शाळेचा स्तुत्य उपक्रम

धारुर/पुण्यभूमी प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील जिल्हा परिषद माध्यमिक शाळा भोगलवाडी येथे विद्यार्थ्यांचा शैक्षणिक वारकरी दिंडी सोहळा आयोजित करण्यात आला . विठ्ठल रुक्मिणी सह वारकऱ्यांच्या वेशभूषेत विद्यार्थ्यांची दिंडी प्रदक्षिणा भोगलवाडी नगरीमध्ये काढण्यात आली. अत्यंत उत्साहाच्या वातावरणात समस्त आजी–माजी पदाधिकारी, पालक आणि शिक्षण प्रेमी यांनी प्रत्यक्ष दिंडी सोहळ्यामध्ये सहभाग घेतला. पावली आणि फुगडी नृत्याने सर्व गावकऱ्यांचे मने जिंकून घेतली. महत्त्वाचे म्हणजे या शैक्षणिक दिंडी सोहळ्यातून शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण, नवसाक्षर भारत, बालविवाह प्रतिबंध आणि पर्यावरणाची जोपासना करणारे शैक्षणिक संदेश देण्यात आले. दिंडी सोहळा यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक तसेच समस्त शिक्षक वृंद, शाळा व्यवस्थापन समिती पदाधिकारी आणि समस्त ग्रामवासियांनी मोलाचे सहकार्य केले.



# तलवाडा येथे विद्यार्थ्यांची बालदिंडी!



तलवाडा/पुण्यभ प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील प्रथामिक व माध्यमिक विद्यालय तलवाडा येथे विद्यार्थ्यांचा शैक्षणिक वारकरी दिंडी सोहळा आयोजित करण्यात आला होता विठ्ठल रुक्मिणी सह वारकऱ्यांच्या वेशभूषेत विद्यार्थ्यांची दिंडी प्रदक्षिणा तलवाडा नगरीमध्ये काढण्यात आली. अत्यंत उत्साहाच्या वातावरणात समस्त आजी–माजी पदाधिकारी, पालक आणि शिक्षण प्रेमी यांनी प्रत्यक्ष दिंडी सोहळ्यामध्ये सहभाग घेतला. पावली आणि फुगडी नृत्याने सर्व गावकऱ्यांचे मने जिंकून घेतली. महत्त्वाचे म्हणजे या शैक्षणिक दिंडी सोहळ्यातून शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण, नवसाक्षर भारत, बालविवाह प्रतिबंध ,झाडे लावा झाडे जगवा, पोलिस, डॉक्टर, विठ्ठल रुक्मणी ज्ञानेश्वर महाराज मुक्ताबाई, जनाबाई, वारकरी, संत तुकाराम महाराज ,एकनाथ महाराज,आणि पर्यावरणाची जोपासना करणारे शैक्षणिक संदेश देण्यात आले. प्रथामिक व माध्यमिक विद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी प्राचार्य प्रमोद गोरकर, प्रवेक्षक अरूण हाटकर, यांच्या मार्गदर्शनाखाली दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक रंजना मरकड, शिक्षीका शेख मॅडम,दिपाली मरकड,रूपाली मागरे, प्रतिमा मराठे,,तसेच समस्त शिक्षक वृंद, यांनी परिश्रम घेतले

**राजेंद्र मस्के** मोफत नोंदणी सुविधा केंद्राचा शुभारंभ

# लाडकी बहिण राज्य सरकारची महत्वकांक्षी योजना

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना ही राज्य सरकारची महत्वकांक्षी योजना असून, राज्यातील महिलांना आर्थिक स्वातंत्र्य आणि त्यांच्या आरोग्य आणि पोषणात भरीव सुधारणा करणारी योजना आहे. या योजनेचा लाभ सर्व पात्र महिलांपर्यंत पोहचवण्यासाठी भारतीय जनता पार्टीचा कार्यकर्ता तत्पर असून, या योजनेचे फॉर्म महिलांना सुलभपणे व विना खर्चात भरता यावेत. यासाठी आपला भाऊ आपल्या सेवेत या संकल्पनेतून विनामुल्य फॉर्म सेवा सुविधा केंद्र सुरु केले असून, बहुसंखे महिलांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन राजेंद्र मस्के यांनी केले आहे.



आपला भाऊ आपल्या सेवेत या संकल्पनेतून भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी व भाजपा कामगार मोर्चाच्या वतीने मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना व घरेलू महिला कामगार नोंदणी फॉर्म या योजनांचा मोफत ऑनलाईन फॉर्म सेवा सुविधा केंद्राचा शुभारंभ संघर्षयोद्धा भाजपा जनसंपर्क कार्यालय, नगर रोड बीड येथे भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ शिराळे, लाडकी बहिण योजना प्रभारी ओमप्रकाश गिरी, मराठवाडा कामगार मोर्चा अध्यक्ष दादासाहेब नन्नवरे, उपाध्यक्ष लालासाहेब पन्हाळे, आत्माराम पवार, प्रदेश कार्यकारणी सदस्या अनिता जाधव, डॉ. जयश्रीताई मुंडे, छायाताई मिसाळ, रंजनाताई दराडे, गोवर्धन दराडे, बालाजी पवार, गणेश बप्पा उगले, कैलास काटे, रावसाहेब मस्के यांच्यासह शेकडो महिलांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

राज्याचे मुख्यमंत्री ना. एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस, ना. अजित दादा पवार यांनी राज्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना कार्यान्वित केली आहे.

महिलांचे वैयक्तिक आर्थिक सबलीकरण करण्याच्या हेतूने दर महा १५०० हजार रुपय मानधन अर्ज दाखल केलेल्या महिलांना मिळणार आहेत.

ही योजना राज्यात तातडीने सुरू केली असून, या योजनेचा लाभ घेण्यासाठी २१ ते ६५ वयोगटातील पात्र महिलांनी आपले फॉर्म ऑनलाईन भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन फॉर्म भरणे करिता पुढील कागदपत्रे महिलांनी सोबत आणावेत. आधारकार्ड, बँक पासबुक, मतदान कार्ड, केशरी किंवा पिवळे राशन कार्ड, पासपोर्ट फोटो, असल्यास शाळेचा दाखला या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती घेऊन याव्यात. ही सुविधा सकाळी ११ ते ०५ यावेळेत सुरु राहील.

# रात्रिच्या पाहर्याने नागरिक त्रस्त

**रंजित बनसोडे:** पोलीसांमार्फत नागरिकांशी लोकसंवाद

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

शहरात सर्वत्र चोर्यांचे वातावरण असून नागरिक भयभीत झाले आहेत त्यामुळे भयभीत नागरिकांसाठी नगरसेवक बनसोडें व तरुण सहकार्यनी पोलीसांमार्फत नागरिकांशी लोकसंवाद कार्यक्रम बापुजी नगर येथील जिनिअस इंग्लीश स्कुलमध्ये प्रभाग क्र.२४ चे नगरसेवक रणजित बनसोडे व युवकानि घेतला असून कार्यक्रमाला पोलीस निरीक्षक खेडकर, संजय राठोड सह परिसरातील ज्येष्ठ नागरिक, महिला भगिनी उपस्थित होत्या.

यावेळी आपल्या मनोगतामध्ये पोलीस निरीक्षक खेडकर म्हणाले की, वाढत्या चोर्यांवर अंकुश लावण्यासाठी आम्ही प्रयत्न करत असून नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये नागरिकांना सर्वतोपरी मदत केली जाईल परंतु कोणाला अडवून कायदा हातात घेवू नका, या परिसरात पोलिस चौकीसाठी प्रयत्न करू,तसेच संशयितांना देखील मारहाण करु नका, रात्रीचे गस्तसाठी पोलिस कर्मचारी वाढउ, व्ययोवृद्ध नागरिकानी जागरण करू नये असे आवाहन पोलीस निरीक्षक श्री. खेडकर यांनी केले आहे. तसेच यावेळी




आपल्या मनोगतात नगरसेवक रणजित बनसोडे, बापू वाघमारे,घाड़गे ताई,डोके सर, शिरसट सर,चकरे सर, परशुराम खोड़, बीडकर सर,बंटी धुताडमल यांनी मनोगत व्यक्त केले धानोरा रोड, अंकुश नगर भागात पोलीस कर्मचारी वाढवा, पोलीस चौकी उभी करा, नागरिकांचे भय दूर करा, चौराच्या अफवा थाबवा, गस्त पथक वाढवा अश्या अनेक मागण्या बोलताना नागरिकानी केल्या असून नागरिकांना संरक्षण द्यावे असे नगरसेवक रंजीत बनसोडे यांनी म्हटले व नरसोबा नगर, अंकुश नगर, धानोरा रोड परिसरातील तरुनाचे व नागरिकाचे कौतुक केले आहे, यावेळी परिसरातील ज्येष्ठ नागरिक, महिला भगिनी उपस्थित होत्या.

**सुविचार** - सामर्थ्य शारीरिक क्षमतेतून येत नाही. ते अदम्य इच्छेपासून येते.

## भाजपवरील नाराजी कायम....!

लोकसभा निवडणुकीत प्रकर्षाने दिसून आलेली मतदारांची भाजपवरची नाराजी अजूनही दूर झालेली नाही, हाच संदेश सात राज्यांमध्ये नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा पोटनिवडणुकीच्या निकालातून समोर आला आहे. सीएए, एनआरसी वगैरे जुन्या मुद्यांना मोदींनी प्रत्यक्ष प्रचारात केलेल्या विखारी भाषणांची जोड मिळाली आणि देशभरातील अल्पसंख्याक समाज भाजपच्या विरोधात अगदी त्वेषाने मतदानासाठी बाहेर पडला. त्यांनी यावेळी कोणत्याही एका पक्षाचा विचार न करता भाजप उमेदवारास पाडण्याची क्षमता असलेल्या उमेदवाराकडे आपली एकगठ्ठा मते वळविली. त्यात भर पडली ती दलित समाजाच्या तीव्र नाराजीची, भाजपला बहुमत मिळाले तर यावेळी मोदी सरकार संविधान बदलून आपले हक्क डावलेल, ही भावना दलित मतदारांमध्ये प्रबळ करण्यात विरोधक यशस्वी झाले, त्याचा परिणाम मतदानात दिसून आला. दलित, मुस्लीम यांच्यासोबतच महाराष्ट्रासारख्या राज्यात मराठा समाज आणि इतर राज्यात अन्य महत्त्वाचे समाजघटक भाजपच्या विरोधात गेले आणि 'चार सौ पार'चा नारा देणारा भाजप कसाबसा २४० वर पोहचला. अर्थात मोदींच्या विरोधात इतकी तीव्र सुप्त लाट असूनही मोदींना पुन्हा सत्तेत येण्यापासून रोखण्यात विरोधक अपयशीच ठरले. लोकसभा निवडणुकीत मोठा फटका बसल्यानंतर भाजपने सावध भूमिका घेत, आपल्या विरोधात गेलेले जनमत पुन्हा आपल्या बाजूने वळविण्याचा प्रयत्न सुरू तर केला; परंतु अवघ्या महिनाभराच्या काळात हे प्रयत्न यशस्वी होणे शक्य नव्हते, त्यामुळे लगेचच झालेल्या विविध राज्यातील विधानसभा पोटनिवडणुकीत भाजपला पुन्हा एकदा दणका बसला. विरोधी पक्षांची सरकारे उलथवून टाकण्यासाठी भाजपने आमदारांची केलेली फोडाफोडीदेखील लोकांना रूचली नाही. त्याचाही परिणाम लोकसभा निवडणुकीत आणि या विधानसभा पोटनिवडणुकीत दिसून आला. विधानसभेच्या एकूण १३ जागांसाठी झालेल्या पोटनिवडणुकीत भाजपला केवळ दोन जागांवर समाधान मानावे लागले, 'इंडिया' आघाडीने दहा जागा जिंकल्या तर एका जागेवर अपक्ष उमेदवार निवडून आला. हिमाचल प्रदेशमधील काँग्रेस सरकार उलथवून टाकण्यासाठी भाजपने काँग्रेसचे काही आमदार फोडले, काही अपक्ष आमदार आपल्या बाजूने वळवून घेतले, त्यामुळे राज्यसभा निवडणुकीत काँग्रेसच्या उमेदवाराला धक्कादायक पराभव स्वीकारावा लागला होता. फुटीर आमदारांनी नंतर भाजपच्या चिन्हावर पुन्हा निवडणूक लढविली; परंतु त्यापैकी केवळ दोन उमेदवार यशस्वी ठरले, इतर चार जागा काँग्रेसने आपल्याकडे कायम राखल्या. ही निवडणूक लोकसभा निवडणुकीसोबतच पार पडली होती. विशेष म्हणजे भाजपने लोकसभेच्या चारही जागा जिंकल्या होत्या; परंतु विधानसभेच्या पोटनिवडणुकीत भाजपला सहापैकी केवळ दोनच जागा जिंकता आल्या. त्यानंतर भाजपसोबत आलेल्या अपक्ष आमदारांनीही राजीनामे देत भाजपच्या चिन्हावर निवडणूक लढविली; परंतु या तीन अपक्ष आमदारांपैकी केवळ एकच पुन्हा निवडून येऊ शकला. प. बंगालमधील चारही जागा तृणमूल काँग्रेसने जिंकल्या. त्यापैकी तीन जागा पूर्वी भाजपकडे होत्या. उत्तराखंडमध्ये दोन्ही जागा काँग्रेसने जिंकल्या. भाजपला केवळ मध्य प्रदेशमधील एक आणि हिमाचल प्रदेशातील एक अशा दोन जागांवर आपली प्रतिष्ठा कायम राखता आली. याचा अर्थ लोकांचा भाजपवरचा राग अजूनही गेलेला नाही. इतर छोट्या-मोठ्या पक्षांना संपविण्याचे, विरोधी पक्षांची सरकारे फोडाफोडी करून पाडण्याचे भाजपचे राजकारण लोकांना मान्य नाही, खरे तर लोकांना या राजकारणाचा अगदी तिटकारा आला आहे, असेच म्हणावे लागेल. लोकांचा हा राग कुठपर्यंत कायम टिकतो किंवा भाजप हा राग घालविण्यासाठी काय प्रयत्न करते, यावर पुढच्या काळात काही महत्त्वाच्या राज्यांमध्ये होत असलेल्या विधानसभा निवडणुकीचा निकाल अवलंबून आहे. लोकांचा आणि त्यातही खास करून दलित, मुस्लीम समाजाचा राग असाच कायम राहिला तर भाजपला महाराष्ट्र आणि हरियाणा या दोन्ही राज्यांमध्ये सत्ता गमवावी लागू शकते. अर्थात लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत मतदान करताना मतदार वेगळा विचार करतात, हे आजपर्यंत अनेकदा दिसून आले आहे. त्यामुळे लोकसभेच्या गणितावर विधानसभा निवडणुकीची मांडणी कदाचित धोकादायक ठरू शकते; परंतु एक बाब मात्र स्पष्ट आहे की ज्या राज्यांमध्ये लोकसभा नि वडणुकीत मतदारांनी भाजपच्या विरोधात कौल दिला, त्या राज्यांमधील राजकीय परिस्थिती अजूनही तशीच कायम आहे, ती तशीच कायम राहिली किंवा त्यात मोठा बदल झाला नाही तर आगामी काळात भाजपला काही महत्त्वाची राज्ये नक्कीच गमवावी लागतील.

## स्पॅनिश जलवा....!

रविवारची रात्र संपूर्ण स्पेनने नाचत, गात, जल्लोष करीत जागवली आणि त्याला कारणही तसेच होते. सुरुवातीला प्रतिष्ठेच्या विम्बल्डन टेनिस स्पर्धेत एकेरीचे विजेतेपद सलग दुसऱ्यांदा जिंकित स्पेनच्या कार्लोस अल्काराझने आपल्या देशवासियांना मोठी भेट दिली आणि त्यानंतर युरो चषक फुटबॉल स्पर्धेच्या अंतिम सामन्यात स्पेनने इंग्लंडचा कडवा प्रतिकार मोडून काढीत विक्रमी चौथ्यांदा या स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले. कार्लोस अल्काराझने विम्बल्डनच्या अंतिम सामन्यात तितकाच तगडा प्रतिस्पर्धी असलेल्या जोकोविचचा तीन सरळ सेटस्‌मध्ये पराभव केला. मागच्या वर्षीही त्याने जोकोविचलाच हरवून विम्बल्डनचे पहिले विजेतेपद पटकाविले होते. फरक इतकाच की मागच्या वर्षी त्याला विजेतेपद प्राप्त करण्यासाठी पाच सेट्‌सपर्यंत कडवी लढत द्यावी लागली; परंतु यावेळी कार्लोसने जोकोविचला अगदी शेवटपर्यंत संधी मिळू दिली नाही. आतापर्यंत तब्बल २४ ग्रॅण्डस्लॅम विजेतेपद पटकविणारा आणि त्यातही सात वेळा विम्बल्डन जिंकणारा जोकोविच या अंतिम लढतीत कार्लोसच्या चपळाईपुढे, त्याच्या वेगवान खेळापुढे अगदीच निष्प्रभ वाटला. अल्काराझने विम्बल्डन जिंकल्यानंतर सगळ्यांच्या नजरा बर्लिनकडे वळल्या होत्या. बर्लिनच्या ऑलिम्पिया स्टेडियमवर रविवारी रात्री उशिरा युरो चषक स्पर्धेचा अंतिम सामना खेळल्या गेला. या अंतिम सामन्यात मध्यंतरापर्यंत कोणत्याही संघाला गोल करण्यात यश आले नाही; परंतु मध्यंतरानंतर लगेच दुसऱ्या मिनिटाला निको विल्यम्सने स्पेनसाठी पहिला गोल केला. इंग्लडकडून कोल पामरने ७३व्या मिनिटाला गोल करीत बरोबरी साधली खरी; परंतु इंग्लंडचा हा आनंद फार काळ टिकला नाही. ८६व्या मिनिटाला मिकेलने स्पेनसाठी दुसरा गोल करीत स्पेनच्या विक्रमी जेतेपदावर शिक्कामोर्तब केले. या आधीही २०२०मध्ये इंग्लंडला युरो चषकाच्या अंतिम सामन्यात पराभव स्वीकारावा लागला होता. तिकडे अल्काराझने सलग दोन वेळा विम्बल्डन जिंकले आणि इकडे इंग्लंडला सलग दुसऱ्यांदा युरो चषकाच्या अंतिम सामन्यात पराभव स्वीकारावा लागला. एकाच दिवशी इतके मोठे दोन विजय म्हणजे क्रीडाप्रेमी स्पॅनिश लोकांसाठी मोठी मेजवानीच होती. त्यामुळे या विजयाचा जल्लोष प्रत्येक शहरातल्या प्रत्येक रस्त्यावर दिसून येत होता.

### स्थित्यंतर

# शाहबानो तेव्हाची...आणि आताची...!




राही भिडे

9867521049


मुस्लीम महिलांना अधिकार मिळवून देण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या १९८५ च्या निर्णयाने देशभर काहूर उठले होते. मुस्लीम समाज रस्त्यावर आला, दंगली घडवल्या. राजीव गांधी यांनी मुस्लीम मतपेढीचा विचार करून नवा कायदा केला, सर्वोच्च न्यायालयाचा आदेश निष्प्रभ ठरवला; परंतु आता सर्वोच्च न्यायालयाने मुस्लीम महिलेला पोटगी देण्याचा आदेश दिला, मात्र कुणीही रस्त्यावर आले नाही. त्याविरोधात ब्र काढला नाही. त्याचे कारण गेल्या चार दशकांत मुस्लीम समाजाच्या शिक्षणात, राहणीमान आणि विचारसरणीत जो फरक झाला त्यात आहे.

सर्वोच्च न्यायालयाने मुस्लीम घटस्फोटित महिलांनाही पोटगी मिळण्याचा अधिकार आहे, असा निकाल नुकताच दिला आहे. शाहबानोच्या प्रकरणातही सर्वोच्च न्यायालयाने १९८५ मध्ये असाच निर्णय दिला होता. तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांच्या सरकारने मौलाना आणि मौलवींच्या दबावाखाली संसदेत कायदा आणून सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय रद्द केला. भक्कम बहुमत असलेले ते सरकार होते, तरीही सरकारने असा निर्णय घेतला. आताही तसाच निर्णय झाला असला, तरी देशभरात त्याची फारशी प्रतिक्रिया उमटली नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या विरोधात आवाज उठवला, तरी मोदी सरकार जुमानणार नाही, हे एक कारण त्यामागे आहे. दुसरे कारण आता मुस्लीम समाजातील सुशिक्षितांनाही बहुपत्नीत्व, दोनपेक्षा जादा अपत्य मान्य नाहीत. राहणीमानाचा तसेच आर्थिक उत्पन्नाचा विचार करून ते निर्णय घ्यायला लागले आहेत. गेल्या चार दशकांत सामाजिक परिस्थिती बदलली आहे. ते आणि आम्ही अशी मुख्य प्रवाहाशी टोकाची भूमिका घेऊन चालणार नाही, अशी मानसिकता झालेली दिसते. तसेच मुस्लीम महिलांनाही आपल्याला इतरांसारखे अधिकार असावेत, असे वाटू लागले आहे. त्यामुळे तर तिहेरी तलाक कायदा रद्द करून त्यात सुधारणा करण्यात आली, तेव्हा समाजाचा विरोध डावलून मुस्लीम महिलांनी त्याचे स्वागत केले. परिणामी, भारतीय जनता पक्षाला मुस्लीम महिलांचे मतदान वाढले. आपला देश स्वतंत्र झाला, त्यावेळी अनेक आव्हाने होती. देश अनेक तुकड्यांमध्ये विभागला गेला होता. त्यावेळी एका कुटुंबाप्रमाणे पुढे जाताना खूप अडचणींचा सामना करावा लागला. त्यावेळच्या सरकारने हिंदू विवाह कायदा संसदेत मंजूर करून घेतला. हिंदूंचा कायदा संहिताबद्ध करण्यात आला. त्याअंतर्गत लग्न कसे होणार, त्यात कोणती कर्तव्ये पार पाडावी लागतील, नेमके काय करावे लागेल आदी गोष्टी कायद्याच्या कक्षेत आणण्यात आल्या होत्या. त्यावेळी त्या कायद्यात पहिल्यांदा घटस्फोटालाही स्थान देण्यात आले होते. पूर्वी हिंदू समाजात अशा गोष्टी अस्तित्वात नव्हत्या. भारतीय समाजाबरोबरच देशातील संसद आणि न्यायालयेही अनेक महिला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी नसल्याचे मानतात. एकदा विवाहितेने घटस्फोट घेतला, की त्यांना जास्त अधिकार राहत नाहीत. अशा महिलांना ना आईच्या घरी राहता येत नाही, ना सासरच्या घरात. त्यामुळे त्यांच्या देखभालीची जबाबदारी कोण घेणार? हा प्रश्न अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे. घटस्फोट झाला तर तिचा पती तिला आर्थिक पाठबळ देईल, असा निर्णय संसदेने घेतला होता. हिंदू विवाह कायद्यात हेच लागू करण्यात आले आहे. हिंदू विवाह कायदा हिंदू, बौद्ध, जैन इत्यादी हिंदू संस्कृतीतून बाहेर पडलेल्या लोकांसाठी बनवला गेला. तो ख्रिश्चन आणि पारशी लोकांसाठीदेखील लागू होतो.

मुस्लिमांसाठी असा कोणताही संहिताबद्ध कायदा आला नाही. देशात १९७३ मध्ये धर्मनिरपेक्ष तरतुदी पाळत असताना या प्रकरणांमध्ये न्यायालय कसे वागेल, याची व्यवस्था करण्यात आली. त्याला फौजदारी संहिता असे नाव देण्यात आले. आता त्याचे नाव आणि कायदा बदलून त्याला भारतीय न्यायिक संहिता असे नाव देण्यात आले आहे. १९७३ अंतर्गत आलेल्या कायद्यात अशी तरतूद होती, की जर एखाद्या महिलेने घटस्फोट घेतला असेल तर कलम १२५ नुसार ती पोटगीचा दावा करू शकते. ही तरतूद विशेष विवाह कायदा किंवा परदेशी विवाह कायद्यांतर्गत विवाह केलेल्यांसाठी होती. १९८५ मध्ये मध्य प्रदेशात शाहबानो नावाच्या मुस्लीम महिलेने तिच्या पतीपासून घटस्फोट घेतला. त्यानंतर न्यायालयाने तिला २५ रुपये पोटगी देण्याचे निर्देश दिले. खालच्या न्यायालयाच्या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान दिले असता उच्च न्यायालयाने दरमहा १७९ रुपये पोटगी देण्याचे आदेश दिले. या निर्णयाला आव्हान देत तिचा पती सर्वोच्च न्यायालयात गेला. तिथे त्याने पोटगी देण्यास असमर्थता दर्शवली. इस्लामिक कॅलेंडरमध्ये लग्नानंतरचे तीन महिने इद्दत कालावधी मानले जातात. यामध्ये महिला गर्भवती आहे की नाही हे पाहिले जाते? असे झाले, तरच पतीला भत्ता देण्याचा अधिकार आहे हा इस्लामचा निकष आहे. इद्दतचा कालावधी संपला आहे आणि आता ती पुन्हा लग्न करू शकते, त्यामुळे तो शाहबानोला भत्ता देऊ शकत नाही, असा युक्तिवाद करण्यात आला. सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने या प्रकरणाची सुनावणी केली. कलम १२५ चा कायदा सर्वांना समान लागू होईल, त्यामुळे त्यांचे अपील चुकीचे आहे, असा आदेश देण्यात आला. त्यानंतर हे प्रकरण पाच न्यायमूर्तींच्या खंडपीठाकडे पाठवण्यात आले. त्याला घटनात्मक खंडपीठही म्हटले जाते. 'ऑल इंडिया मुस्लीम पर्सनल लॉ बोर्ड' आणि 'जमात-ए-उलेमे हिंद' हे पक्षकार आणि हस्तक्षेप करणारे म्हणून या प्रकरणात सामील झाले. न्यायालय मुस्लिमांच्या खटल्यांचा अर्थ लावत असेल तर कुराणाच्या दृष्टिकोनातून पाहावे लागेल, असे त्यांच्या बाजूने सांगण्यात आले. कुराणानुसार इद्दत कालावधीपेक्षा जास्त भत्ता देता येत नाही, मग न्यायालय हे मान्य करण्यासाठी दबाव कसा निर्माण करू शकते, असा सवाल करण्यात आला. सर्वोच्च न्यायालयाने शाहबानोच्या बाजूने निकाल देताना म्हटले, की फौजदारी संहितेचे कलम १२५ सर्वांना लागू होते, त्यानुसार तिच्या पतीला पोटगी द्यावी लागेल.

कुराणातही घटस्फोटित पत्नीला पोटगी देऊ नये, असे कुठेही म्हटलेले नाही किंवा त्यात कोणत्याही प्रकारचा निषिद्ध उल्लेख नाही. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले, की या देशात स्त्री-पुरुषांना समान अधिकार आहेत. राज्यघटनेचे कलम ४४ हेच सांगते. फौजदारी संहितेचे १२५ कलम हिंदू, जैन आणि बौद्ध धर्मासाठीही लागू आहे, मग मुस्लिमांसाठी वेगळा अधिकार का, हे लक्षात घेऊन न्यायालयाने हा निर्णय दिला आणि त्यानंतर समान नागरी कायदा आणण्याची गरज असल्याचेही सांगितले. न्यायालयाच्या निर्णयानंतर मोदी सरकारने तिहेरी तलाक बंद केला आहे आणि त्याची पूर्ण अंमलबजावणीही केली आहे. आता 'मुस्लीम पर्सनल लॉ' आणि इतर संस्थांना हे कळून चुकले आहे, की मुस्लीम स्त्रिया आता केवळ त्यांची मालमत्ता राहिलेल्या नाहीत. कुराणाचा हवाला देऊन ते महिलांच्या हक्कांचे उल्लंघन करू शकत नाहीत. या देशात मुस्लीम महिलांकडे वेगळ्या नजरेने पाहिले जाऊ शकत नाही. सर्व महिला समान आहेत. जेव्हा हिंदू महिला संपत्तीचा हक्क मागू शकतात, तर मुस्लीम महिला का नाही? हिंदू धर्मात पत्नीला फार पूर्वीपासून अर्धा जोडीदार मानले जाते. कुराणातही महिलांच्या हक्कांसाठी अनेक गोष्टी सांगण्यात आल्या आहेत. 'पर्सनल लॉ बोर्ड' आणि इतर बैठकांद्वारे मुस्लीम आधीच्या सरकारांवर दबाव आणत असत, पण मोदी सरकारवर दबाव आणू शकले नाहीत.

### सरळ-सरळ

# म्हणे, लिमिटेड होतं तेच बरं होतं...




राजेश राजोरे

9822593903


सर्व काही नासले, आभाळच फाटले, असे सांगून 'चिंता' केल्याने बिघडलेल्या गोष्टी चांगल्या होत नाही, पण त्यावर 'चिंतन' केल्याने योग्य मार्ग सापडतो, एवढे मात्र खरे!

**खर्च करना हो जो एक रुपया**
**तो एक ही हूँ करता,**
**खुद को फिजूल खर्ची से**
**होने वाले असर से बचाता हूँ!**

सोशल मीडिया सर्व काही वाईट करण्याचे मुळाशी आहे, असा सरसकट आरोप करणे कदापी योग्य ठरणार नाही. सोशल मीडिया हा दुधारी तलवार सारखा आहे. याचा चांगला व वाईट असा बराच मोठा प्रभाव दिसून येतो. सोशल मीडियावरील अनेक पोस्ट वादग्रस्त, बहुचर्चित, अपमान करणाऱ्या असतात तर याउलट सकारात्मकता पसरवून अनेक गोष्टींवर चिंतन करायला लावणाऱ्या पण असतात. प्रत्यक्षात सोशल मीडिया हे व्यक्त होण्याचे एक प्लेटफॉर्म व साधन आहे, यावर कोण कसा व्यक्त होतो, हा ज्याचा त्याचा प्रश्न असतो. मात्र आत्मबळ वाढविणाऱ्या, सकारात्मकता, आत्मविश्वास व भरपूर चिंतन करायला लावणाऱ्याही पोस्ट असतात.

नुकत्याच व्हायरल झालेल्या दोन पोस्ट कोणी लिहिल्या हे माहित नाही मात्र पोस्ट प्रत्येकाला प्रत्येक गोष्टींसाठी आयुष्य जगताना खूप महत्त्वाच्या ठरु शकतात. सुरुवातीला गेल्या १० वर्षात अनेकांची आर्थिक स्थिती बिघडविणाऱ्या गोष्टींची चर्चा एका पोस्टमध्ये करण्यात आली आहे. यामध्ये अनुक्रमे घरातील प्रत्येक व्यक्तीने स्मार्ट फोन व प्रत्येक वर्षी नवीन फोन घेणे, वाढदिवस, ॲनिवर्सरीमध्ये अनावश्यक खर्च व दिखावा करणे, जीवनशैली बदलामुळे खर्चाचे प्रमाण वाढविणे, मुलांचं शिक्षण, शाळा, क्लास फी यामध्ये वाढ होणे, (१ ली पासून ट्युशन लावणे), घरातील जेवणापेक्षा बाहेरील हॉटेलचा खर्च यात खोटी प्रतिष्ठा जपणे, लग्न तर आहेच, पण प्रतिष्ठेसाठी साखरपुड्यावरही भरमसाठ खर्च करणे, कर्जाचे व्याज भरणे, खाण्यापिण्यात बदलामुळे मेडिकल खर्चात वाढ होणे, अनावश्यक खर्चात वाढ होऊन, पगार कमी-खर्च जास्त होत आहे. परिणामी, तणाव वाढणे, तसेच लोक, नातेवाईक काय म्हणतील? या भीतीपायी कर्तव्य भावनेपाई पैशाचा चुराडा करणे, आदी प्रकार मांडून अनावश्यक खर्च कमी करा! असा महत्त्वाचा संदेश नमूद आहे.

दुसरी एक पोस्ट अशी, 'लिमिटेड होतं तेच बरं होतं', पूर्वी बहुतांश गोष्टी लिमिटेड होत्या व त्यामुळे आपले आयुष्य किती सुखी होते बघा... टी.व्ही.वर १-२ चॅनल्स होती व ती पण लिमिटेड वेळेसाठी. रात्री ठराविक वेळेनंतर बंद व्हायची व घरातील लोकं एकतर झोपायला जायची, नाहीतर छान गप्पा मारायची, दोनचाकी वाहनांचे उत्पादन लिमिटेड होते, बुकिंग केल्यावर वर्ष-दीडवर्षाने वाहन मिळायचे, त्यामुळे रस्त्यावरील वाहनांची संख्या लिमिटेड होती. प्रवासाचा आनंद मिळायचा. गोडाधोडाचे पदार्थ फक्त सणासुदीला असायचे, ते पण लिमिटेड. त्यामुळे स्थूलतेचे प्रमाण कमी होते. शाळांमध्ये लिमिटेड अभ्यास असायचा. त्यामुळे मुलांना खेळायला वेळ मिळायचा व मुलांची मानसिक व शारीरिक जडणघडण नीट व्हायची. बहुतांश ठिकाणी वर्किंग अवर्स लिमिटेड होते, संध्याकाळी ५-६ च्या दरम्यान ऑफिसेस बंद व्हायची व माणसे वेळीच घरी पोहोचून कुटुंबासाठी वेळ द्यायची. अशा अजून अनेक गोष्टी आहेत ज्या लिमिटेड होत्या. त्यामुळे आपले आयुष्य खूप सुखी होते. आता सगळंच अनलिमिटेड झालंय... आणि त्यामुळे जीवनातील सुख मात्र खूपच लिमिटेड झालंय!!

तेव्हा पोरांच्या छातीच्या बरगड्या दिसायच्या आणि पोट अगदी पाठीला टेकलेले दिसायचे. आता चौथी-पाचवीच्या पोरांचीपण सुटलेली पोटे दिसतात, तेव्हा पोरं दिवसभर खेळून खेळून रात्री बिछान्यावर अंग टाकले की गाढ झोपायची, आता पोरं दिवसभर बसून 'कॉम्प्युटर गेम्स' खेळून रात्री late night movies एन्जॉय करत जागत बसतात. तेव्हा आमच्या घरात फक्त आजी-आजोबांना डोळयाला चष्मा असायचा आता दुसरीची मुलं नाकावरील चष्मे सावरत शाळेत बसतात. तेव्हा वडिलांचा फार धाक असायचा आता पोरं नाराज होऊ नयेत म्हणून लाड पुरविले जातात. मुळात काय की, तेव्हा आम्हाला फार काही मिळत नसतानाही आनंदात जगता यायचं आता बरंच काही मिळत असूनही आनंदी जीवन कसे जगावे यांवरील 'सेमिनर्स अटेंड' करावे लागतात, एवढेच.

एकूणच उपरोक्त दोन्ही पोस्टचा विचार आपण करायला हरकत नाही. कारण सर्व काही नासले, आभाळच फाटले, असे सांगून 'चिंता' केल्याने बिघडलेल्या गोष्टी चांगल्या होत नाही, पण त्यावर 'चिंतन' केल्याने योग्य मार्ग सापडतो, एवढे मात्र खरे!

शेवटी त्या दिशेने प्रयत्न व्हावेत या आशयाचा शेर आठवतो...

**शायद अगली एक कोशिश तकदीर बदल दे,**
**जहर तो जब जी चाहे खाया जा सकता है!**

**खामगाव, जि. बुलडाणा.**

(लेखक हे दैनिक देशोन्नतीच्या बुलडाणा आवृत्तीचे संपादक आहेत.)

### अवकाश

# नासाची प्राथमिक आभासी मंगळ मोहीम पूर्ण!




प्रा. सुरेश चोपणे

9822364473

खगोल अभ्यासक अध्यक्ष- स्काय वॉच ग्रुप


मागील मंगळवारी मी या सदरात आपण मंगळावर राहू शकू का? या विषयावर लिहिले होतेय. आज तोच विषय पुढे नेवून अमेरिकेने मंगळ मोहिमेसाठी केलेल्या आभासी मोहिमेवर भाष्य करणार आहे. मागील शनिवारी ६ जुलै रोजी ४ शास्त्रज्ञ आभासी मंगळ मोहिमेवरून तब्बल ३७८ दिवसानंतर वापस आले आहेत. नासाने मंगळावर मानव पाठविण्याची तयारी सुरू केली आहे, याचीच रंगीत तालीम म्हणून गेल्या एक वर्षापासून नासाने मंगळावर जाण्यासाठी मानवास लागणाऱ्या आवश्यक गरजा आणि आरोग्य सांभाळण्यासाठी लागणारी उपयोगी व्यवस्था तपासण्यासाठी ४ वैज्ञानिकांना जवळजवळ एक वर्ष ३७८ दिवस आभासी मंगळ वातावरणात ठेवल्या गेले. जगातीलही अशा प्रकारची पहिलीच मोहीम होती. अशा पुन्हा २ मोहिमा आखण्यात येणार आहेत. असे अनेक प्रयोग केल्यानंतरच पुढील मानव मोहीम आखल्या जाईल.

या आभासी मोहिमेचे नाव होते. CrewHealth and Performance Exploration Analog project ह्या मोहिमेत एका बंद तंबू (डोम) मध्ये मंगळ सदृश्य हवामान आणि पर्यावरण बनविण्यात आले. त्यात स्पेस वाक आणि मंगळावर पोहोचल्यावर ज्या आवश्यक गतिविधी कराव्या लागतात त्या सर्व करविण्यात आल्या. या मोहिमेत मेडिसिन फिजिशियन नाथन जोन्स, नेव्ही मायक्रोबायोलोजिस्ट अंका सेलारिऊ, रिसर्च सायंटिस्ट केली हास्टन आणि स्ट्रक्चर इंजिनियर रॉस ब्रोकवेल यांनी सहभाग घेतला होता.

**मोहीम कशी होती?** : ह्युस्टन येथील नासाच्या जोन्सन स्पेस सेंटर येथे १७०० वर्ग फुट आकाराच्या एका 3D हवाबंद तंबूमध्ये २५ जून २०२३ पासून ६ जुलै २०२४ पर्यंत विविध प्रयोग करीत तज्ज्ञांनी तब्बल ३७८ दिवस घालविले. जगाशी आणि कुटुंबाशी वास्तविक संपर्क न ठेवता ३७८ दिवस राहणे अतिशय कठीण असते. या मोहिमेत मंगळावरील अल्फा ड्युन सदृश्य स्थिती तयार करण्यात आली. त्यात ४ निवासी खोल्या, काम करण्यासाठी थोडी जागा, एक व्यायाम शाळा, एक रोबोट स्टेशन, प्रयोग करण्याचे साहित्य, उभी शेती, मंगळसदृश्य माती टेकडी आणि विविध प्रयोगासाठी सभोवती १२०० स्क्वे. फूट जागा अशी व्यवस्था करण्यात आली होती. त्यात स्पेस वॉक भाज्याची लागवड करणे असे प्रयोग केले गेले. विशेष म्हणजे कमीत कमी सुविधा, आरोग्यावर मनावर आणि कामावर होणारा परिणाम आणि एक वर्ष एकटे राहण्याची सवय हा प्रयोग महत्त्वाचा होता. पुढे आर्टमीस मोहिमेत चंद्रावर जास्त दिवस राहण्यासाठी हा अनुभव कामी येणार आहे. त्यासाठी पुन्हा पुढील दोन मोहिमा २०२५ आणि २०२६ मध्ये आखल्या जाणार आहेत.

इतके दिवस राहूनसुद्धा तज्ज्ञांना फारशा समस्या जाणविल्या नसल्याचे शास्त्रज्ञांनी सांगितले, असे असले तरी प्रत्यक्ष मंगळावर जाणे आणि पृथ्वीवर प्रयोग करणे ह्यात खूप फरक असतो, कारण इथे आपल्याला माहीत असते की आपण सुरक्षित आहोत; परंतु मंगळावर जायचे असेल तर कमीतकमी एक वर्ष किंवा जास्त दिवस तिथे राहायची सवय तर करावी लागेलच. नासाने २०३० पर्यंत मानवी मंगळ मोहीम पाठविण्याचे ठरविले आहे



तत्पूर्वी मानवासाठी सुरक्षितता अतिशय महत्त्वाची आहे. तिथे जायला आणि यायलाच यानात एक ते दीड वर्ष घालवावे लागतात. इतक्या लांब आणि इतके दिवस अवकाशात घालविताना होणारा मानसिक ताण शारिरिक समस्या अन्न आणि प्राणवायू पुरवठा आणि तेथे पोहोचल्यावर करण्यात येणारे प्रयोग अशा सर्वावर मात करणे कठीण असते. म्हणूनच अवकाश यात्रींना असा सराव करवून घेणे हाच महत्त्वाचा टप्पा आहे. म्हणूनच नासाने याची आतापासूनच तयारी सुरू केली आहे अशा मोहिमेतून आणि अनुभवातून गोळा केलेली माहिती प्रत्यक्ष मोहिमेत खूप कामी येणार आहे. मंगळ हा ग्रह भविष्यात मानवाला राहायला योग्य बनवायचे असेल किंवा अशाच परिस्थितीत तिथे राहण्याची तयारी करावयाची असेल आणि तिथे जीवनाचा शोध घ्यावयाचा असेल तर मंगळावर मानव मोहीम यशस्वी करावी लागेल. पाहूया नासाने सुरुवात केली आहे भारताचे सुद्धा मंगळयान २ पुढील वर्षी प्रक्षेपित होण्याची शक्यता आहे. त्यात रोवर हेलीकॉप्टर आणि स्काय क्रेनचा समावेश राहील. नासाला हार्दिक शुभेछा!

### वाचक विचार मंच

## शासकीय कार्यक्रमात मराठी भाषेची अवहेलना...

गेल्या चार दिवसात महाराष्ट्राच्या राजधानी मुंबईत दोन शासकीय कार्यक्रम मोठ्या दिमाखात पार पडले. पहिल्या कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य विधानपरिषदेच्या शताब्दीनिमित्ताने उपराष्ट्रपती जगदीश धनखड यांनी विधानभवनात राज्य विधानमंडळाच्या सदस्यांना मार्गदर्शनपर भाषण केले. दुसऱ्या एका शासकीय कार्यक्रमात प्रधानमंत्री (पंतप्रधान!) नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मुंबईतल्या अनेक पायाभूत प्रकल्पांचे भूमिपूजन आणि विकासकामांचे उद्‌घाटन करण्यात आले. मात्र, या दोन्ही शासकीय कार्यक्रमाचे निवेदन आणि सूत्र संचालन महाराष्ट्राची राज्यभाषा (राजभाषा) असलेल्या मराठी भाषेऐवजी हिंदीमध्ये करण्यात आले. मुंबईतल्या विविध पायाभूत प्रकल्पांच्या माहितीचे लघुपटही हिंदी भाषेत दाखविण्यात आले. त्यामुळे महाराष्ट्राची राज्यभाषा नक्की कोणती? हिंदी की मराठी? असा प्रश्न पडला. एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे ती म्हणजे येथे हिंदी भाषेला विरोध नाही. आक्षेप आहे तो राज्याच्या शासकीय कार्यक्रमात मराठीला डावलून केल्या जाणाऱ्या वाढत्या हिंदी भाषेच्या वापरावर. दुसरीकडे मराठी भाषेचे शब्दभांडार समृद्ध असूनही शासकीय जाहिरातीतून मराठी शब्दांना डावलून सातत्याने हिंदी शब्दांचा वापर केला जातो. उदाहरणार्थ शासकीय जाहिरातींमधून 'मेरी माटी मेरा देश', 'आझादी का अमृत महोत्सव', 'पंतप्रधान' या मराठमोळ्यया शब्दाऐवजी 'प्रधानमंत्री' असे शब्द वापरले जातात. या पार्श्वभूमीवर, भविष्यकाळात शासकीय जाहिराती तसेच कार्यक्रमातून मराठी या आपल्या राज्याच्या राज्यभाषेचा सन्मान राखला जाईल, अशी मराठीजनांची अपेक्षा आहे.

**प्रदीप शंकर मोरे**

मो.नं.:९८७०७७७२७४

### धुम्मस

**लबाडी**

कोणते आमदार फुटले?
कोणी केला विश्वासघात?
संशयाच्या भोवऱ्यात
कोण आहेत ते सात?

ज्यांच्या नावाने हल्ली
पक्षश्रेष्ठी कण्हतात
तो मी नव्हेच असे
सर्वजण म्हणतात


गद्दारांसाठी निवडणुकीत
भले मोठे घबाड असते
निष्ठावंताचा आव आणणारी
ही मंडळी खूप लबाड असते

**ॲड्. अनंत खेळकर**
अकोला

### संवाद

## कॅगचे सरकारवर ताशेरे; उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्याची शिफारस

सध्या अनेक देशात अनेक सरकारे लोकांना विविध स्वरूपाच्या योजना जाहीर करत आहेत. हे सारे देऊनही राज्य सरकार लोकांची कामाची निष्क्रियता वाढवीत आहेत, असे म्हटल्यास वावगे नाही. आता याचा महाराष्ट्र सरकारनेसुद्धा उपयोग करून घेण्याचे ठरविलेले दिसते. महाराष्ट्रातसुद्धा अनेक लोकोपयोगी योजना जाहीर केल्या जात आहेत. यामध्ये मुख्य म्हणजे लाडकी बहीण ही योजना आहे. या योजनेसाठी सरकारचे हजारो कोटी रुपये खर्च होणार आहेत. नुकतेच महाराष्ट्र सरकारच्या आर्थिक कारभाराबाबत नुकताच एक रिपोर्ट कॅगने दिला आहे. राज्याच्या तिजोरीवरील वाढत्या आर्थिक ताणावर कॅगच्या अहवालात चिंता व्यक्त करण्यात आली आहे. ३१ मार्च २०२३ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षातील अहवाल नुकताच विधानसभेत मांडला गेला. त्यात ही चिंता व्यक्त करण्यात आली आहे. महसुली तूट लक्षात घेता उत्पन्नाचे



विविध स्त्रोत वाढविण्याची शिफारस या कॅगच्या अहवालात करण्यात आली आहे. महसुली जमा २०१८-२०१९ ते २०२१-२०२३ या कालावधीत २ लाख ७८ हजार ९९६ कोटीवरून ११.३१ टक्के सरासरी वाढीच्या दराने ४ लाख ५ हजार ६७७ कोटीवर पोहचली आहे. राज्याच्या खर्चाचा भार पाहिल्यास २०१८-१९ ते २०२२-२०२३ या दरम्यान महसुली खर्च २ लाख ६७ हजार २१ कोटीवरून ४ लाख ७ हजार ६१४ कोटीवर गेला आहे. साहजिकच महसुली जमा व महसुली खर्च यातील तफावतीमुळे १ हजार ९३६ कोटीची महसुली तूट निर्माण झाल्याचे दिसत आहे. याशिवाय कर्जाऊ निधीचा मोठा हिस्सा हा भांडवली विकास कामासाठी वापरला जात होता असे निरीक्षणसुद्धा कॅगने आपल्या अहवालात नोंदविले आहे. राज्याचे थकित कर्ज २०१८-२०१९ मध्ये ४३६७८१ कोटी रुपयांवरून २०२२-२३ अखेरीस ६६०७५३ कोटी रुपयावर पोहोचले आहे. एकूणच सरकारने या शिफारशींची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे.


**शांताराम वाघ**, पुणे

:+९१ ९६२३४ ५२५५३

swagh30948@gmail.com

### गुल्लेर

# जमवा जुगाड




नरेंद्र इंगळे

9561226572


'तुहा डोंगा फसला मावशी..'

'काय झालं बापा मनोहर?'

'लाडकी बहिनसाठी जमत नाही. तुव्ह वय पासट दाखून राह्यलं आधार कार्डावर.. लाडकी बहिनले साठच्या अंदर वय पाह्यजे'.

'पासट कसं बापा? आजून तुहा मावसा पासटचा झाला नाही. मी मावशापेक्षा दहा वर्षानं लहान आहो.'

'मंग हे आधार कार्ड खोटं आहे काय?'

'त्याच्यावर जन्मतारीख वाढून टाकेल आहे'.

'जन्मतारीख कायले वाढवली? कोनं सांगतले रिकामे धंदे?'

'त्या एसटीच्या सवलतीसाठी वय वाढवलं होतं. त्याटाईमले अर्ध तिकीट नव्हतं. म्हनून बारक्यानं खोटं वय टाकलं.'

'कायले खोटे धंदे केले? आता किती भारी चाललं हे?'

'हे कार्ड काढल्यापासून मी कुठी गेली नाही बापा.. एकच डाव शेगावले गेली होती.'

'टिसी दाखो तुही..'

'टिसीच नाही माह्यापाशी'

'काहून? तू शाळा शिकली नाहीस काय?'

'मंधातूनच शाळा सोडली. माही माय म्हने लेकरं वागोयाले कोनी नाही.. तू घरीच राह्य.'

'कोन्या शाळेत शिकली तू?'

'शिकली कायची.. मी शाळेतच गेली नाही. बुढा म्हने पोट्टी वाया गेली.. लवकर लगन करून टाका.'

'शेवटचा वर्ग कोनता होता? नववीत होती की दहावीत? ज्या वर्गात होती त्याची टिसी शाळेतून काढा लागते.'

'सांग किती घोर झाला.. लगनाले बत्तीस वर्ष झाले.. इतक्या दिवसाचे कागदपत्र सापडतीन काय?'

'भेटते ना.. ॲप्टीट्यूट करा लागते.'

'काय करा लागते?'

'जुगाड करा लागते..'

'त्या बारक्याले मालूम हाय.. तो करुन देते. त्याले म्हना शंभर दोनशे देऊन जुगाड करुन दे.'

'बारक्या गेला पंढरपुरले.. ते जुगाड लवकर जमत नाही मावशी.. भलकसी गर्दी आहे तहसीलीत.. थप्पीच लागली अर्जाची.'

'मंग असं कर.. तुह्या मावशाले घेऊन जाय.. मावसा बातच जुगाड जमोते. तुह्या मावशानं जुगाड करून त मले पटवलं.'

दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी

# पारनेर तालुक्याला १२१ कोटी रुपये खरिपाचा पीकविमा

## खासदार नीलेश लंके यांची माहिती

देशोन्नती वृत्तसंकलन



**नगर :** मागील सन २०२३ मधील पीक विम्यापोटी पारनेर तालुक्यातील शेतकऱ्यांना १२१ कोटी रुपयांचा पीकविमा मंजूर झाल्याची माहिती खासदार नीलेश लंके यांनी दिली. यापूर्वी १६ कोटी ५० लाख रूपयांचा सोयाबीन पिकासाठीचा विमा जमा झाला असून आता उर्वरित पिकांसाठी १०५ कोटी रूपये असा एकूण १२१ कोटी रूपयांचा विमा शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होणार आहे.

कोणत्या पिकासाठी किती विमा याची मंडलनिहाय आकडेवारी लवकरच जाहिर करण्यात येणार आहे. तालुक्यातील हवामान तसेच नैसिर्गीक स्थितीचा आढावा घेऊन शेतकऱ्यांना पिक विम्याचा लाभ व्हावा यासाठी खा. नीलेश लंके यांनी शासनाकडे पत्रव्यवहार तसेच पाठपुरावा केला होता. शासनाकडून शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या प्रत्येक योजनेचा लाभ मिळावा यासाठी खा. लंके हे नेहमीच प्रयत्नशिल असतात. त्याचाच एक भाग म्हणून पीक विम्यासोबतच शेतकऱ्यांसाठी कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध वैयक्तीक लाभाच्या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी खा. लंके यांनी दरवर्षीप्रमाणे यंदाही पाठपुरावा केला होता.

मागील वर्षीच्या खरीप हंगामात मुग, सोयाबीन, बाजरी, तूर, कांदा, उडीद या ७१ हजार २५५ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचा ५७ हजार १८५ शेतकऱ्यांनी विविध १ लाख ४८ हजार ८३४ आवेदनपत्रांद्वारे पीकविमा उतरविला होता.

दरम्यान, पीकविमा उतरविल्यानंतर तालुक्यातील शेतकऱ्यांना सोयाबिनची अग्रीम रक्कम म्हणून १६ कोटी ५० लाख रूपये इतकी रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आली असून उर्वरीत १०५ कोटी रूपये इतकी रक्कम लवकरच शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होणार आहे. पीक विम्यासंदर्भात काही अडचण असल्यास आपल्या पारनेर शहरातील संपर्क कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन खा. लंके यांनी केले आहे.



◆ मनोज जरांगे पाटील यांची टीका

# भुजबळांना दंगली घडवायच्यात

देशोन्नती वृत्तसंकलन

**वडीगोद्री (जालना) :** 'छगन भुजबळ यांना राज्यात गोड बोलून दंगली घडवायच्या दिसतात. ते कोणाचेच नाहीत. फक्त स्वतःच घर कसे भरले, हेच पाहतात. अतिबेइमान माणूस आहे, त्यांच्यासारखा माणूस जन्मू नाही कोणत्याच समाजात. इतके वाद लावून देणारा, इतके काड्या लावून देणारा, इतके वातावरण दूषित केले त्यांनी. आता जाऊन सांगतात की, शांतता राहिली पाहिजे. इथून मागे नीट वागायचं ना कशाला शेण खाल्ल', अशी सडकून टीका मनोज जरांगे पाटील यांनी छगन भुजबळ यांनी शरद पवारांची भेट घेतली यावर केली.

पंढरपूर येथे जाऊन विठ्ठलाचे दर्शन घेऊन जरांगे पाटील हे सोमवारी सकाळी अंतरवाली सराटी येथे दाखल झाले. या दरम्यान त्यांच्याशी पत्रकारांनी संवाद साधला. ते म्हणाले, 'छगन भुजबळ गेले काय आणि राहिला काय, कुठे बसलाय काय याच्याशी आम्हाला घेणे देणे नाही. लय बेईमान आहे, जिथे खातात तिथेच घाण करतात. त्यांना वाटते असेच पेटत ठेवायचे आणि विधानसभेला फायदा उचलायचा. हातात त्यांच्या आहे की तुमच्या आहे, त्यांना द्या ना लाथ मारून काढून.' असे आवाहन जरांगे यांनी केले.

मराठा आरक्षण संदर्भात सर्वपक्षीय बैठकीला बहिष्कार घातला, यावरून जरांगे पाटील यांनी सरकारवर टीका केली. 'तुमची राजकीय इच्छाशक्ती आहे. तर तुम्ही द्या ना, तुम्हाला द्यायचे नाही. याच्या त्याच्याकडे बोट दाखवता. त्या छगन भुजबळच्या आहारी चालले. हा छगन भुजबळ यांचा नवीन डाव आहे. तोही सरकारनेच आखायला लावला असेल अस मला वाटते. मीडियात सांगायचं की, शांतता राहिली पाहिजे म्हणून. मी याच्यात्याच्या दारोदारी भीक मागत हिंडतोय असं याला दाखवायचं आहे, असा डाव दिसतोय. पण शांतता शब्द वापरायचा आणि राज्यात दंगल लावून द्यायची', अशी टीका जरांगे यांनी केली.

## सरकार म्हणेल तर बलिदान देण्यास तयार

'माझ्या समाजासाठी जीवाची बाजी लावू शकतो. सरकारने माझे दोन्ही हात आणि दोन्ही पाय तोडून जरी मागितले तरी मराठा आरक्षणासाठी द्यायला तयार आहे. सरकार जर म्हणल तुझे मुंडके उद्या सकाळी तोडून दे, आम्ही आरक्षण देतो. तर मी उद्या सकाळी शिंदे साहेबांच्या आणि फडणवीस साहेबांच्या दारात मुंडकं तोडून द्यायला तयार आहे. समाज आपला मायबाप आहे. तर मरायला काय घाबरायचे. आपल्या समाजासाठी आपला जीव जाईल त्याच्या पलिकडे काय होईल. माझ्या समाजासाठी माझे बलिदान गेलं तर समाजाच तरी कल्याण होईल', असेही जरांगे म्हणाले.

# बल्लारपूर पोलिस ठाण्याच्या शिपायाची आत्महत्या

देशोन्नती वृत्तसंकलन



**विसापूर :** बल्लारपूर पोलिस ठाण्यात कार्यरत शिपाई याने घरी कोणी नसताना गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना सोमवार (दि. १५) रोजी दुपारी १२ वाजता उघडकीला आली. या घटनेमुळे पोलिस प्रशासनात एकच खळबळ माजली आहे. त्याने दोन दिवसापूर्वीच गळफास घेतला असावा, असा अंदाज पोलिसांनी वर्तविला आहे.

आत्महत्या केलेल्या पोलिस शिपाईचे नाव अजय पांडुरंग मोहुर्ले (४०) असे असून तो बल्लारपूर पोलीस वसाहतीच्या सदनिकेत राहत होता. अजयला सात वर्षाचा मुलगा व पत्नी असा परिवार आहे. अजय मोहुर्ले हा बल्लारपूर पोलिस ठाण्यात शिपाई म्हणून कार्यरत होता. तो गांधी चौक परिसरातील पोलिस वसाहतीच्या सदनिकेत कुटुंबासोबत राहत होता. त्याची पत्नी मागील आठवड्यात त्याच्या दारूच्या व्यसनाला कंटाळून नातेवाईकांकडे गेली होती. शनिवारला तो पोलिस ठाण्यात आला. त्यानंतर तो घरी गेला. घरी कोणीच नसल्याची संधी त्याने साधली.

पोलिस वसाहतीच्या सदनिकेतील घरी त्याने गळफास घेऊन जीवनयात्रा संपविली. आज सोमवारला अजयचे मामा हरिश्चंद्र निकुरे चंद्रपूर येथून त्याला भेटण्यासाठी पोलिस वसाहतीत आले. त्यांनी अजय राहत असलेल्या सदनिकेचे दार ठोठवले. मात्र आतून काहीच प्रतिसाद मिळत नव्हता. घरातून दुर्गंधी येत होती. त्यांनी याची माहिती सदनिकेतील अन्य लोकांना दिली. त्याच प्रमाणे बल्लापूर पोलिस ठाण्याला देखील माहिती देऊन कळविले. पोलिसांनी तातडीने घटनास्थळ गाठून पंचनामा केला.

## आजपासून दहावी बारावी पुरवणी परीक्षा

**नागपूर :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे जुलै-ऑगस्ट २०२४ मध्ये घेण्यात येणारी दहावी-बारावीची पुरवणी परीक्षा मंगळवारपासून सुरू होत आहे. १२वीची परीक्षा १६ जुलै ते ६ ऑगस्ट, तर दहावीची परीक्षा १६ ते ३० जुलै या कालावधीत होणार आहे. परीक्षार्थीना तणावमुक्त वातावरणात परीक्षा देण्याकरिता कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवून शांततापूर्ण वातावरणात परीक्षा पार पाडणे आवश्यक आहे. तसेच परीक्षेच्यावेळी केंद्रावर कोणतेही गैरप्रकार व आवारात गर्दी टाळणे, महत्त्वाच्या विषयाच्या पेपरच्या दिवशी उपद्रवी केंद्रांना आकस्मिक भेटी देऊन गैरप्रकारांना प्रभावीपणे आळा घालण्यासाठी जिल्हा प्रशासनातील पाच अधिकाऱ्यांचे दक्षता पथक तयार करण्यात आले आहे.

# प्रस्तावित 'पे अँड पार्क'ला शिवसेना उबाठाचा विरोध

## काँग्रेस-राष्ट्रवादी शरद पवार गटाचे पदाधिकारी उपस्थित

देशोन्नती वृत्तसंकलन



**नगर :** अहमदनगर महापालिकेचे नगर शहरात ३६ रस्ते आणि जागांवर पे अँड पार्क सुरू करण्याचे प्रस्तावित आहे. या प्रस्तावाला नगर शहर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाने विरोध दर्शवला आहे. अगोदर नगर शहरातले रस्ते दुरुस्त करा, प्रशस्त करा आणि मग पे अँड पार्क लागू करा अशी मागणी शिवसेनेच्यावतीने करण्यात आली आहे. शिवसेना युवा सेनेचे राज्य सहसचिव विक्रम राठोड यांनी याबाबत मनपा आयुक्तांना निवेदन दिले आहे.

पार्किंगची समस्या नगर शहरात खूपच बिकट आहे. चितळे रोड, कापड बाजार, माळीवाडा या रस्त्यावर चार चाकी वाहन लावण्यास जागा नाही. दुचाकी गाड्या बेशिस्तपणे रस्त्यावर पार्क केलेले असतात. ही समस्या सोडवण्यासाठी पार्किंग साठी शुल्क आकारणे हा उपाय होऊ शकत नाही. मनपा पार्किंग शुल्क आकारणीचा ठेका खाजगी ठेकेदाराला देत आहे. याद्वारे मनपाला पाच वर्षात २१ लाख रुपये मिळणार आहे असा दावा कागदोपत्री केला जातो आहे. नगर शहर आणि सावेडी भागातील विविध रस्त्यांवर काही ठिकाणी नो होकर्स झोन लागू करून त्या ठिकाणी शुल्क घेऊन पार्किंग सुरू करणार आहे.

एका तासाला टू व्हीलर ला पाच रुपये आणि फोर व्हीलर ला दहा रुपये शुल्क आकारण्यात येणार आहे. नगर शहरांमध्ये अनेक ठिकाणी बेकायदेशीरपणे स्थानिक गुंड पार्किंग सेवा देऊन शुल्क घेतात. आता अधिकृतपणे ठेका देऊन वाहन चालकांकडून करण्यात येणारी शुल्क आकारणी हा मनपा ने लादलेला जिझिया कर आहे असा आरोप शिवसेनेने केला आहे.

मनपाने शुल्का आकारणी करू नये, ठराव विखंडित करावे अन्यथा शिवसेना या ठेकेदाराला पार्किंग शुल्क आकारणी करू देणार नाही असा इशारा देण्यात आला आहे. यावेळी माजी महापौर भगवान फुलसौंदर, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अभिषेक कळमकर, काँग्रेसचे किरण काळे, शिवसेना शहर प्रमुख संभाजी कदम, नगरसेवक बाळासाहेब बोराटे, प्रशांत भाले, गौरव ढोणे, आनंद राठोड आदींसह शिवसैनिक उपस्थित होते.

# आदिवासी महिलेचा कुपोषणाने मृत्यू

देशोन्नती वृत्तसंकलन



**वैजापूर :** तालुक्यातील पारळा येथील एका आदिवासी महिलेचा कुपोषणाने मृत्यू झाल्याची घटना शनिवारी रात्री घडली. ललिता सोमनाथ मोरे (४०) असे मयत महिलेचे नाव आहे. या घटनेमुळे खळबळ उडाली आहे. पारळा येथील ललीता या काही दिवसांपासून कुपोषणामुळे आजारी होत्या. त्यांची तब्येत काही दिवसांपासून खालावली होती. त्यांना उपचारासाठी शुक्रवारी संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारा दरम्यान या महिलेचा मृत्यू झाला. पारळा येथे मोठ्या प्रमाणावर आदीवासी वस्ती आहे. या परीसरात वडजी, भादली, तलवाडा या गावात आदीवासी वस्ती आहे. या गावातील बालके व महिलांमध्ये मोठ्या प्रमाणात कुपोषण आहे. मात्र आरोग्य विभागाचे या बाबींकडे दुर्लक्ष होत आहे. अरोग्य विभागाच्या दुर्लक्षामुळे एका आदिवासी महिलेचा कुपोषणाने मृत्यू झाला आहे.

कुपोषण प्रकरण प्रशासनाकडून दबल्या जाता आहे. या प्रकरणी चौकशी करण्याची मागणी करण्यात येणार असल्याचे माजी उपसरपंच तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी चे जिल्हा उपाध्यक्ष विशाल शेळके यांनी सांगितले. थॉयरॉईड ग्रस्त सदर महिला ही थायरॉईड आजाराने ग्रस्त होती. त्यामुळे तिचा मृत्यू झाला. तिच्या कुपोषणाची माहीती नाही असे वैजापूरचे तालुका वैद्यकीय अधिकारी राजनाथ इंदुलीकर म्हणाले.

# तब्बल 15 दिवसांपासून लातूरचा आडत बाजार ठप्प!

## बाजाराकडे लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष

देशोन्नती वृत्तसंकलन



**लातूर :** राज्यात नावलौकिक असलेल्या तसेच मराठवाड्यात सर्वात मोठ्या असलेल्या लातूरच्या उच्चतम कृषीउत्पन्न बाजार समितीचा आडत बाजार १५ दिवसांपासून ठप्पच आहे. परिणामी दररोजची कोट्यवधीची उलाढाल ठप्प झाली आहे. शिवाय हमाल-मापाडी या घटकाची उपासमार सुरु झाली आहे. लातूरच्या आडत बाजाराकडे लोकप्रतिनिधींनी दुर्लक्ष केल्याचे स्पष्ट होत आहे.

दररोज २० ते २५ हजार क्विं. केवळ सोयाबीनची आवक होणारा लातूरचा आडत बाजार आहे. याशिवाय इतर शेतमाल मोठ्या प्रमाणात या आडत बाजारात येतो. दररोज कोट्यवधीची उलाढाल होणारा हा आडत बाजार १५ दिवसांपासून बंद असूनही याकडे बाजार समितीचे मार्गदर्शक व राज्याचे माजी मंत्री आ. अमित देशमुख यांचे दुर्लक्ष झाले आहे.

आडत बाजारात खरेदी झालेल्या शेतमालाची रक्कम खरेदीदारांनी आडत्यांना तात्काळ द्यावी, असा आदेश प्रथमतःच लातूरच्या बाजार समितीने काढला. पूर्वापार लातूरचे खरेदीदार पंधरवड्यानंतर खरेदी शेतमालाची रक्कम आडत्यांना देत होते. मात्र गेल्या वर्षभरात काही खरेदीदारांनी शेतमालाची रक्कमच आडत्यांना न दिल्याने आडते गोत्यात आले. जवळपास ७ कोटींची ही रक्कम असल्याची चर्चाही आहे. या पार्श्वभूमीवर आडत्यांनी खरेदीनंतर तात्काळ पेमेंटची मागणी लावून धरली. त्यावर बाजार समितीने आदेश काढला. मात्र बाजार समितीचा आदेश जाचक असल्याने त्यास विरोध करत व्यापाऱ्यांनी आडत बाजारात सौद्यावर येणेच बंद केले. परिणामी गेल्या पंधरवड्यापासून आडत बाजार ठप्प आहे.

# विविध मागण्यांसाठी महसूल कर्मचारी संघटनेचे काम बंद आंदोलन

## जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठिय्या

देशोन्नती वृत्तसंकलन



**नगर :** महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटनेच्या वतीने महसूल विभागाची सुधारित आकृतीबंध दांगट समितीच्या अहवालातील शिफारसी प्रमाणे कोणत्याही संवर्गातील कर्मचारी कपात न करता लागू करावा व अव्वल कारकून मंडळ अधिकारी संवर्गातून नायब तहसीलदार संवर्गात तात्काळ पदोन्नती देऊन आदेश निर्गमित करण्यात यावे व महसूल विभागाचा आकृतीबंध तात्काळ मंजूर करून पुरवठा विभागातील पदभरती मुळे रिक्त होणारे महसूल कर्मचारी यांना महसूल विभागात सामावून घेण्यात यावे व वेतन देयके उणे प्राधिकारपत्रावर वाढवण्याबाबत तात्काळ शासन निर्णय निर्गमित करण्यात यावा व महसूल सहाय्यकांचा ग्रेड पे १९०० वरून २४०० करण्यात यावा तसेच महसूल सहाय्यक व तलाठी यांना सेवा अंतर्गत एकसमान परीक्षा पद्धती लागू करण्यात यावे व महाराष्ट्र शासन वित्त विभाग याची अधिसूचना दिनांक ३ फेब्रुवारी २०२३ नुसार तात्काळ अव्वल कारकून यांची वेतन निश्चिती करण्यात यावी तसेच महसूल सहाय्यकांची सेवा जेष्ठता यादी केवळ महाराष्ट्र महसूल अहर्ता परीक्षा नियम १९९९ मधील तरतुदीनुसार तयार करण्यात यावी तसेच महसूल विभागातील अधिकारी कर्मचारी यांची सेवा पुस्तिका लेखा अधिकारी वेतन पडताळणी पथका ऐवजी समक्ष असलेल्या महसूल विभागातील नियुक्त लेखा अधिकारी यांचे वेतन पडताळणीचे अधिकारीमार्फत करण्यात यावी व अव्वल कारकून या सवर्गाचे पदनाम बदलून सहाय्यक महसूल अधिकारी असे करण्यात यावे तसेच नायब तहसीलदार संवर्गाचा गेड वेतन ४८०० करण्यात यावा अव्वल कारकून यांना मंडळ अधिकारी पदावर अदलाबदली धोरणास नुसार पदस्थापना देण्यात यावी व नायब तहसीलदार पदासाठी अव्वल कारकून मंडळ अधिकारी यांच्याकरिता पदोन्नती विभागीय परीक्षा सरळ सेवा करण्यात यावे व चतुर्थ श्रेणी शिपाई कर्मचाऱ्यांना पदोन्नती देत असताना तलाठी संवर्गामध्ये २५टक्के पदोन्नती देण्यात यावी तसेच कोतवाल पदांना चतुर्थ श्रेणी दर्जा देण्यात यावा व कोतवाल पदोन्नती कोटा वाढवण्यात यावे आदीसह विविध मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर महसूल कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष राजेंद्र आंधळे यांच्या नेतृत्वाखाली काम बंद आंदोलन करण्यात आले.

# लैंगिक छळ करून आक्षेपार्ह व्हिडिओ केले व्हायरल

देशोन्नती वृत्तसंकलन

**गोंदिया :** सोशल मीडियाच्या माध्यमातून मैत्री जुळवून आरोपीने अल्पवयीन मुलीला प्रेमाच्या जाळ्यात ओढले. तसेच तिच्यावर वारंवार अत्याचार करून लैंगिक छळ केला. आरोपी एवढ्यावरच थांबला नाही तर त्याने त्या अल्पवयीन मुलीचे काढलेले आक्षेपार्ह व्हिडीओ व्हॉयरल केले. या संदर्भात फिर्यादीच्या तक्रारीवरून आरोपी दैनिक शेळके (२२) रा. सुंदरनगर गोंदिया याच्याविरूध्द गुन्हा नोंद करून अटक करण्यात आली आहे.

सविस्तर असे की, सोशल मीडियाचा गैरवापर काही नविन गोष्ट नाही. यामाध्यमातून अनेक युवक-युवतींची फसवणूक केली जात आहे. यासाठी नवनविन प्रकार शोधले जातात. वाढत्या घटनांवरून सोशल मीडियाचा वापर चिंतनाचा विषय ठरला आहे. असाच प्रकार गोंदिया शहरात उघडकीस आला आहे. गोंदियातील आपल्या आजीकडे लहानपणापासून राहणारी १७ वर्षाची पीडित ही महिभाभरापूर्वी नागपूर येथे राहायला गेली. गोंदियात आपल्या आजीकडे असतांना त्या मुलीच्या आयडीवर आरोपी दैनिक शेळके (२२) रा. सुंदरनगर गोंदिया याने इंस्ट्राग्राम आयडीवर त्याने फ्रेंड रिक्वेस्ट पाठविली. त्याची फ्रेंड रिक्वेस्ट तिने स्वीकारली. त्या दोघांची इंस्टाग्रामवरच चांगलीच मैत्री झाली. पाहता-पाहता दोघांचे मैत्रीतून प्रेमात रूपांतर झाले. यातूनच त्या दोघांत शारीरीक संबध प्रस्तापीत झाले. त्याने त्या मुलीचे अनेकदा शारीरीक शोषण झाले. त्या दोघांची आक्षेपार्ह व्हीडीओ काढून दैनिक शेळके याने युट्यूबवर प्रसारीत करून तिची बदनामी केली. या घटनेसंदर्भात गोंदिया शहर पोलिसात गुन्हा दाखल केला आहे. तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक विजय गराड करीत आहेत.

### व्हिडिओ व्हॉयरल अन् प्रकरण पोलिसात

आरोपी दैनिक शेळके याने त्या १७ वर्षाच्या मुलीला १ मार्च २०२४ ला संदुर नगरच्या चौकी येथे बोलावून सुंदरनगरातील लाल बंगल्यात घेऊन गेला. त्याने तिच्यावर अत्याचार केला. त्यानंतर अनेकदा त्याने तिच्यावर अत्याचार केला. त्यातच ५ जुलै २०२४ रोजी दैनिक शेळके याने तिला कुडवा परिसरातील डॉमीनोजच्या समोरील एका घरी तिला बोलाविले. त्या दोघांचे पैश्यावरून तिथे वाद झाला. यावरून आरोपीने तिला शिविगाळ करीत मारहाण केली. या वादातून संतापलेल्या दैनिक शेळके याने तिच्यासोबत आक्षेपार्ह काढून ठेवलेले व्हीडीओ व्हायरल केले. आणि फिर्यादीने पोलिस ठाणे गाठून याची तक्रार केली आणि घटनेचे बिंग फुटले. आरोपी दैनिक शेळके व अल्पवयीन मुलगी यांचे मागील एक वर्षापासून प्रेम प्रकरण होते. या प्रेमप्रकरणातूनच लैंगिक शोषण झाले. या प्रकरणाला घेवून पिडीत मुलीने बर्डी पोलिस ठाणे गाठून आपबिती सांगितली. यानंतर पोलिसांनी गुन्हा नोंद करून गुन्हा गोंदिया शहर पोलिसांकडे वर्ग केला. आरोपीला अटक करून पोलिसांनी न्यायालयात हजर केले. न्यायालयाने त्याची रवानगी तुरूंगात केली आहे.

# शेतशिवारात महिलांवर वीज पडून दोघींचा मृत्यू

## डोंगरगाव येथील घटना, चार जखमी

**आंधळगाव :** मोहाडी तालुक्यातील डोंगरगाव शेत शिवारात धान रोवणीच्या कामासाठी गेलेल्या महिलांवर वीज पडल्याने दोन महिलांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. ही घटना काल दुपारी साधारणतः तीन वाजता घडली.

आंधळगाव येथील आशा सुरेश सोनकुसरे (५४) आणि कमला सुखा गोखले (६४), या दोन महिलांचा वीज पडल्यामुळे जागीच मृत्यू झाला. त्याचवेळी शेतात काम करत असलेल्या अन्य चार महिला गंभीर जखमी झाल्या आहेत. जखमींमध्ये आंधळगाव येथील रुखमा बंडू निमजे, मैना पतीराम सोनकुसरे तर डोंगरगाव येथील वंदना मधुकर जीभकाटे, निशा जिभकाटे यांचा समावेश आहे. जखमींना तात्काळ प्राथमिक आरोग्य केंद्र मोहाडी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच पोलिस पथक घटनास्थळी दाखल झाले. या घटनेने संपूर्ण गावात शोककळा पसरली असून, मृत महिलांच्या कुटूंबियांना तात्काळ शासकीय मदत देण्यात यावी, अशी मागणी आंधळगाव ग्रामवासीयांनी केली आहे.



**नागपूर :** नागपुरात अद्यापही पावसाने जोर पकडला नाही. मात्र पाऊस अचानक बरसतो आणि गायब होतो. सोमवारी सायंकाळी काही काळ मुसळधार बरसलेल्या पावसाने मोर भवन बस स्थानकाचे तळे केले.

# अजिंठा लेणीत धोकादायक धबधब्याजवळ पर्यटकांची फोटोबाजी

देशोन्नती वृत्तसंकलन

**फर्दापूर (छ. संभाजीनगर):** अजिंठा लेणीत आलेले पर्यटक जीव धोक्यात घालून वाघूर नदी पात्रातील धबधब्या जवळ फोटो व व्हिडिओ काढत आहेत. फर्दापूर पोलिसांनी धोकादायक ठिकाणी फोटो काढण्यासाठी बंदी घातलेली असतानाही हे पर्यटक जिवाची परवा न करता धबधब्या जवळील दरी परिसरातील धोकादायक ठिकाणी नदी पात्रात जात आहेत. तर पर्यटनस्थळावर सावधानता बाळगत खबरदारीचे आवाहनाला पर्यटकांकडून बगल दिले जात असल्याचे दिसून येत आहे.

## जिल्हा प्रशासनाच्या आवाहनाला बगल



पावसाळ्यात, अजिंठा लेणी परिसर हिरवळीने बहरुन गेला आहे. त्यातच लेणीतील धबधबा धोधो करून कोसळत असल्यामुळे वाघुर नदीला पात्रात ही पाणी खळाखळत आहे. यामुळे अजिंठा लेणीतील निसर्ग सौंदर्य बहरुन गेले आहे. अजिंठा लेणीतील हे मनोहारी सौंदर्य पाहण्यासाठी मोठ्या संख्येने पर्यटक अजिंठा लेणीत व लेणीतील धबधबा परिसरात गर्दी करतांना दिसत आहे. मात्र या ठिकाणी निसर्गाचा मनसोक्त घेण्यासाठी आलेले पर्यटक आपल्या जीवाची पर्वा न करता शेवाळलेल्या वाघूर नदी पात्रासह, धबधब्या जवळील डोंगराच्या टोकावर जावून फोटो काढतांना मोबाईल शुटिंग करतांना दिसत आहेत.

## पोलिसांच्या आदेशाची खुलेआम पायमल्ली

वास्तविक पाहता मागील काही दिवसापासून लेणी परिसरात पाऊस होतांना दिसत आहे. यामुळे नदीपात्रा जवळील खडक शेवाळले असून डोंगर कडा ढिसूळ झाल्याचे दिसत आहे. त्यामुळे या ठिकाणी फोटो काढणे अत्यंत जिकरीचे झाले असतांना ही येथे येणारे पर्यटक जीव धोक्यात घालून धबधब्या जवळ व दरी काठावर फोटो व व्हिडिओ शुटिंग करतांना दिसत आहे. हा प्रकार असाच सुरु राहिल्यास यामुळे भविष्यात या ठिकाणी एखादी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. विशेष म्हणजे अजिंठा लेणीतील धोकादायक ठिकाणी फोटो काढण्यास फर्दापूर पोलिसांनी बंदी घातलेली असतांना ही अजिंठा लेणीत येणारे पर्यटक पोलिसांच्या आदेशाची खुलेआम पायमल्ली करतांना दिसत आहे.

# चंद्रपूर जिल्ह्यात कलम ३६ लागू

**चंद्रपूर :** मोहरम हा उत्सव मुस्लीम धर्मीय व काही प्रमाणात हिंदू समाजातर्फे साजरा करण्यात येतो. जिल्ह्यात १६ व १७ जुलै रोजी मोठ्या प्रमाणात मिरवणुका व धार्मिक कार्यक्रम साजरे करण्यात येणार असल्याने जिल्हयात कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने तसेच आषाढी एकादशी निमित्त १८ जुलै च्या मध्यरात्रीपर्यंत कलम ३६ चे पोटकलम अ ते फ लागू करण्यात आले आहे. मुंबई पोलिस कायद्यान्वये खालील नमुद केल्याप्रमाणे जिल्हा पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी योग्य निर्बंध व निर्देश देण्याचे अधिकार चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व पोलिस ठाणे प्रभारी अधिकारी यांना प्रदान केले आहे.

# मुस्लिमांनो, फक्त मतं देणारे नाही तर मतं घेणारे ही बना

## असदुद्दीन ओवैसी यांचे समाजाला आवाहन • एआयएमआयएम विधानसभा निवडणूक लढविणार • औरंगाबाद येथे पार पडली महत्वपूर्ण बैठक • बीडच्या विधानसभा निवडणुकीवर होणार परिणाम

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने एआयएमआयएम पक्षाची राज्यपातळीवरील बैठक नुकतीच औरंगाबाद येथे पार पडली. या बैठकीमध्ये पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा खासदार बॅरिस्टर अल्हाज असदुद्दीन ओवैसी यांनी तसेच पक्षाचे प्रदेशाध्यक्ष तथा मा. खासदार इम्तियाज जलील यांनी आपले मनोगत व्यक्त करताना वरील उद्गार काढले.

मराठवाड्याची राजधानी औरंगाबाद येथे महाराष्ट्र विधानसभेसाठी एआयएमआयएम पक्षाची दिनांक १३ जुलै २०२४ शनिवार रोजी एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष असदुद्दीन ओवैसी, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष तथा माजी खासदार इम्तियाज जलील, हैदराबाद येथील आमदार अहेमद बलाला, प्रदेश कार्याध्यक्ष डॉ. अब्दुल गफ्फार कादरी, मराठवाडा विभागाध्यक्ष फिरोज लाला, प्रदेश उपाध्यक्ष सय्यद मोईन, बीड जिल्हाध्यक्ष ड. शेख शफीक भाऊ यांच्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील जिल्हाध्यक्ष अन्य पदाधिकारी तसेच नगरसेवकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

या बैठकीमध्ये महाराष्ट्रातील एकंदरीत सर्व राजकीय तसेच पक्षीय वाटाघाटीवर सखोल चर्चा करण्यात आली. आतापर्यंत मुस्लिम समाजाला फक्त निवडणुकीपुरते वोट बँक समजून वापरून निकालानंतर फेकून देणारे राजकीय पक्ष आणि त्यांच्या नेत्यांच्या दृष्टिकोनावर ही चांगलेच खलबते झाले. महाराष्ट्रात असलेल्या मुस्लिम समाजाच्या जनसंख्येनुसार मुस्लिमांना सत्तेत भागीदारी मिळते का? देशाच्या संसदेत लोकसभा आणि राज्यसभा तसेच राज्याच्या विधानसभा व विधान परिषदेत किती मुस्लिम खासदार आणि आमदार आहेत? यावरही दृष्टिक्षेप टाकण्यात आला. यापूर्वी राज्याच्या विधान परिषदेत किमान एक ते दोन मुस्लिम आमदार असायचे परंतु आता पान २ वर...



### ढोंगी सेक्युलर पक्षांनी मुस्लिमांना काय दिले - ओवैसी

मुस्लिम समाजाला आजपर्यंत कोणत्याही राजकीय पक्षाने संख्येनुसार सत्तेत भागीदारी दिली नाही. यामुळे समाजातील हाताच्या बोटावर मोजता येतील असे लोक सोडले तर मुस्लिम समाज इतर समाजाच्या तुलनेत खूप मागे गेला आहे.अनेक राजकीय पक्ष ढोंगी सेक्युलरपणाचा आव आणत मुस्लिम समाजाला मुर्खात काढत आहेत. आता मुस्लिम समाजाने सावध व्हायला हवे. कारण ढोंगी सेक्युलर पक्षांनी मुस्लिम समाजाचे हित आजपर्यंत ही पाहिले नाही व पाहणार ही नाहीत. समाजाला चांगले दिवस आणायचे असतील तर एआयएमआयएम पक्षासोबत या. पक्षाला बळकट करा आणि समाजाच्या लोकसंख्येच्या दृष्टीने सत्तेत भागीदारी मिळविण्यास हातभार लावा,असे आवाहन ओवैसी यांनी केले.

**अभी नही तो कभी नही: जलील :** यावेळी येणारी विधानसभा मोठ्या प्रमाणात राजकारणाचे ध्रुवीकरण करणारी ठरणार आहे. आजपर्यंत मुस्लिम समाजाची मते घेऊन आपले इप्सित साध्य करणारे पक्ष व त्यांचे नेते पुन्हा एकदा विधानसभा निवडणुकीत मुस्लिम समाजाला मुर्खात काढण्यासाठी सज्ज होण्याचा प्रयत्न करू लागले आहेत. त्यांचा हा प्रयत्न हाणून पाडण्यासाठी एआयएमआयएम पक्ष समाजासोबत खंबीरपणे उभा आहे. समाजाने लक्षात घ्यावे, मुस्लिम समाजाची सत्तेतील भागीदारी दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. यामुळे समाजाच्या प्रश्नांना न्याय मिळत नाहीये. समाजाला चांगले दिवस आणायचे आहेत. समाजाच्या प्रश्नांना सोडवायचे आहे. याकरिता येत्या विधानसभा निवडणुकीत एआयएमआयएम पक्ष देईल त्या उमेदवाराला निवडून देऊन विधानसभेत पाठवायचे आहे. तरच मुस्लिम समाजाची नोंद घेतली जाईल. यामुळे अभी नही तो कभी नही हा दृष्टिकोन समोर ठेवून एआयएमआयएम पक्ष येत्या विधानसभा निवडणुकीत पूर्ण ताकदीनिशी मैदानात उतरणार आहे.

---

# मंत्र्यासह आमदारांचे वेतन-भत्ते, पेन्शन बंद करा!

## अॅड. नारायण गोले: महसूल कर्मचाऱ्यांच्या संपाला पाठिंबा

माजलगाव/प्रतिनिधी महसूल कर्मचाऱ्यांचा १५ जुलैपासून बेमुदत संप सुरू असून या संपात दांगट समितीच्या अहवालानुसार आकृतीबंध मंजूर करून तात्काळ पद भरती करा यासह इतर मागण्यासाठी महसूल कर्मचारी शासनाच्या विरोधात आंदोलन करत असताना शासन त्यांच्या मागण्या कडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे, वास्तविक महसूल सह सर्वच कार्यालयात अधिकाऱ्यासह कर्मचाऱ्यांची संख्या ही केवळ नगण्य असून रिक्त अधिकाऱ्यासह कर्मचाऱ्यांचे कामकाज या कर्मचाऱ्यांकडे असल्याने नागरिकांची अनेक कामे महिन्यांनी महिने खोळंबून पडत असून नागरिक शासकीय कार्यालयाचे दरवाजे झिजवत असताना शासनाला त्याचे सोयर सुतक राहिलेले नाही करिता महसूल कर्मचाऱ्यांच्या बेमुदत संपाच्या मागण्या मंजूर करून दांगट समितीच्या अहवालानुसार तात्काळ पद भरती करून कार्यालयात खोळंबून पडलेली नागरिकांची कामे करण्याबाबत नवीन नोकर भरती करून उपाययोजना कराव्यात शासनाने २००५ सालापासून विविध कार्यालयातील अधिकाऱ्यासह कर्मचाऱ्यांना पान २ वर...



# संत रोहीदास महामंडळास व्यवस्थापक द्या

## बाळासाहेब राऊत : जिल्हा प्रशासनास दिले निवेदन

तलवाडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ,मुंबई या ठिकाणी चर्मकार समाजातील समाजबांधवांना महामंडळाकडून उपलब्ध होणाऱ्या कर्ज प्रकरणा संबधी, उपलब्ध कर्ज निधी संबधी विचारणा संत रोहीदास प्रतिष्ठानाचे अध्यक्ष तुळशीराम वाघमारे,तुकाराम ( आप्पा ) सोनटक्के यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्हाअध्यक्ष बाळासाहेब राऊत यांनी भेट घेवुन केली आहे. त्याच बरोबर बीड जिल्ह्याच्या कार्यालयाला कायमस्वरूपी व्यवस्थापक देण्यात अशी मागणी संत रोहिदास चर्मोद्योग व विकास महामंडळचे व्यवस्थापकीय संचालक मा धम्मज्योती गजभिये यांच्याकडे केली आहे त्याच बरोबर चर्मकार महामंडळास भरघोस निधी उपलब्ध करून द्यावा असिही मा करण्यात आली आहे यावर व्यवस्थापक यांनी गरजवंतांनी विनात्रुटी सह अर्ज दाखल केल्यास अर्ज पडताळणी करून तात्काळ कर्ज मंजूर करण्याची हमी दिली. संत रोहिदास चर्मोद्योग व विकास महामंडळाचे सह संचालक श्री रितेश गोंदले पान २ वर...





**गेवराई :** सय्यद वहाब सेवानिवृत्त व सय्यद अतिया बानो हज यात्रा पूर्ण करून आल्यानंतर त्यांचा सत्कार करताना युवा पत्रकार सुशिल टकले, लिटल फ्लॉवर इंग्लिश स्कूलचे चेअरमन गणेश गिरे आदी.

---

# हित बाजुला ठेवून एकत्र यावे

## मनोज आगे :श्रीरामपूर जिल्ह्यासाठी एल्गार



राहुरी/पुण्यभुमी प्रतिनिधी श्रीरामपूर जिल्हा होण्यासाठी राजकीय नेत्यांनी आपले राजकीय हित तसेच पुढील पिढीचे हित व राजकारण बाजूला ठेवून सर्वांनी श्रीरामपूर जिल्हा होण्यासाठी एकत्र येऊन एकत्रित लढा उभा करावा असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार मनोजकुमार आगे यांनी केले

स्वाभिमानी श्रीरामपूर जिल्हा कुती समितीच्या वतीने श्रीरामपुर बंद चे आवाहन करण्यात आले होते त्या बंद ला उस्फूर्तपणे प्रतिसाद मिळाला

गेल्या ४० वर्षी पासून जिल्हा निर्मिती चा विषय प्रलंबित आहे या साठी अनेक निवेदने झाली अनेक आंदोलने प्रभावीपणे झाली परंतु अद्यापही शासनाने या कडे लक्ष दिले नाही सर्वांना सोयीचे असे ठिकाण श्रीरामपूर हे आहे या साठी श्रीरामपूर कर पहिल्या पासून पान २ वर...

# महसूल कर्मचारी बेमुद्दत संपावर

## आंदोलन :तहसीलमधले कामकाज ठप्प!

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज येथील महसूल कर्मचाऱ्यांनी आपल्या विविध मागण्यासाठी दि. १० पासून सुरू झालेल्या महसूल कर्मचाऱ्यांच्या राज्यव्यापी आंदोलनाच्या अनुषंगाने बीड जिल्ह्यातील केज तहसील मधील संपूर्ण महसुली कार्यालयातील कर्मचारी यांनी १० जुन रोजी काळ्याफिती लावून आंदोलनाला सुरवात केली आहे. दांगट समितीचा अहवाल स्वीकारून महसूल विभागाचा आकृतीबंध तात्काळ मंजूर करणे, महसूल विभागातील महसूल सहाय्यक, महसूल कर्मचारी यांचा ग्रेड पे वाढवून देणे व रिक्त पदे तात्काळ भरणे आदी मागण्यांबाबत महसूल कर्मचारी संघटनेच्या वतीने राज्यव्यापी आंदोलन पुकारले आहे. यापूर्वी झालेल्या आंदोलनात राज्य शासनाने राज्य महूसल कर्मचाऱ्यांना मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, त्या आश्वासनाची पूर्ततः होत नसल्याने महाराष्ट्र राज्यातील सर्व महसुली कर्मचाऱ्यांकडून १० जुलैपासून टप्प्याटप्प्याने कार्यालयावर निदर्शने, १२ जुलैरोजी लेखणी बंद आंदोलन तर १५ जुलैपासून बेमुदत कामबंद आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनामध्ये केज तहसील कार्यालयातील मधील वाघ मॅडम, जी.पी. ननवरे, पवार के. के. पठाण, जे.डी. तोळमारे, शिकलगार एस., उमरे टि.के., भिसे व्ही. आर., खोटे एम. जी. कावळे एफ.आर., तपसे एस. पान २ वर...




# गेवराईत विठ्ठल नामाची शाळा भरली!

## आषाढी: द लिटल फ्लॉवर किड्स स्कूलमध्ये बालदिंडी



गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

आषाढी एकादशी निमित्त द लिटल फ्लावर किड्स स्कूल, गणेश नगर, गेवराई येथे आषाढीच्या पूर्वसंध्येला मंगळवार दि.१६ जुलै रोजी शाळेत बालगोपालांनी विठ्ठल-रुक्मिणीसह वारकऱ्यांची वेषभुषा साकारुन विठ्ठल नामाचा जयघोष करत विठ्ठल नामाची शाळा भरवली तसेच बाल दिंडी काढून आषाढी एकादशी उत्साहात साजरी करण्यात आली.

आषाढी एकादशीनिमित्त लाखो वारकरी, भाविक विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपूरला रवाना झाले आहेत. दरम्यान विठुराया अन् आषाढीचे विशेष महत्त्व शाळेतील चिमुकल्यांना समजावे, या उद्देशाने द लिटल फ्लावर किड्स स्कूल, गणेश नगर, गेवराई येथे आषाढी एकादशी निमित्त बाल दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये वृक्षदिंडी, रिंगण सोहळा पान २ वर...

---

**अस्मानी** | बहुलखेड्यात पंचवीस एकर शेती वाहून गेली

# सोयगावसह सात गावांना अतिवृष्टीचा फटका

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगाव आणि जरंडी मंडळात सोमवारी झालेल्या अतिवृष्टी चा सोयगाव सह सहा गावातील पिकांना फटका बसला आहे दरम्यान बहुलखेडा शिवारात नाल्याच्या पुराचे पाणी शेतात शिरल्याने २५ एकर शेतीसह खरिपाची पिके वाहून गेल्याचा प्रकार मंगळवारी उघडकीस आला आहे

सोयगाव, गलवाडा, वेताळवाडी, जरंडी,निंबायती ,धिंगापूर आणि बहुलखेडा या सात गावांत खरिपाच्या पिकांची अतिवृष्टीमुळे नुकसान झाले आहे दरम्यान बहुलखेडा शिवारात नाल्याचे शेती शिवारात शिरल्याने शेतांचा नाला तयार होऊन मका कपाशी पिकांसह शेती वाहून गेली आहे यामध्ये कैलास राठोड यांचे गट क्र ११२ मधील चार एकर शेती पिकांसह पुरात वाहून गेली ईश्वर जाधव यांची मक्याचे क्षेत्र असलेली दोन एकर क्षेत्र वाहून गेले आहे बहुलखेडा शिवारात अतिवृष्टीमुळे दहा शेतकऱ्यांची २५ पान २ वर...



सोयगाव मंडळात झालेल्या अतिवृष्टीमुळे खरिपाच्या कोवळ्या पिकांच्या नुकसान झाले आहे कृषी विभागाने पाहणी हाती घेतली आहे महसूल कडे प्राथमिक अहवाल सादर केल्या वर पंचनामे आदेश मिळतील महसूल कृषी आणि पंचायत असे त्रिस्तरीय पथक पंचनामे करतील

-मदन शिदोदिया,ता. कृषी अधिकारी

सोयगाव परिसरात ७२ मी मी अतिवृष्टी ची नोंद झाली आहे त्यामुळे खरिपाच्या पिकांचे नुकसान झालेले आहे यासाठी संबंधित तलाठ्यांना नुकसानीची पाहणी करून तातडीने तीन दिवसांत अहवाल सादर करण्याचे सूचना दिल्या आहे

-मनीषा मेने, तहसीलदार सोयगाव

# मुंडेवाडीतील अवैद्य दारु विक्री बंद करा!

## संतप्त : महिलांची केज पोलिसांकडे मागणी

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील मुंडेवाडी येथे अवैध दारूच्या विक्रीने गावातील तरुण पिढी व्यसनाधीन होत असल्याने व गावातील शांतता व सुव्यवस्था बिघडत असून त्याचा त्रास महिलांना होत असल्याने गावातील महिलांनी भाजपचे नेते सुनील घोळवे यांच्या नेतृत्वाखाली केज पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक प्रशांत महाजन यांची भेट घेऊन गावातील अवैद्य दारू विक्री बंद करण्याची मागणी लेखी निवेदनाद्वारे केली आहे. केज तालुक्यातील मुंडेवाडी येथे नवनाथ गहिनीनाथ घोळवे, चंद्रसेन (बबन) दादाराव घोळवे आणि अशोक रंगनाथ तोगे हे तिघे अवैध व बेकायदेशीरपणे दारू विक्री करत आहेत. त्यामुळे गावामधील लहान मुले दारुच्या व्यसनाला बळी पडत आहेत. दारुडे गावात धुमाकूळ घालीत असून महिलांना मारहाण करत आहेत. या अवैध दारू विक्री करणाऱ्या लोकांच्या विरुद्ध नेकनूर पोलिस स्टेशन व केज पोलिस ठाण्यात अनेक वेळा कारवाया झालेल्या आहेत. या अवैध दारू विक्रेते हे गुंड प्रवृतीचे असल्याने त्यांच्या विरोधात तक्रार करण्यास गावातील कोणी हिंमत करत नाही. जर कोणी त्यांच्या विरोधात तक्रार केली तर त्यांच्या जीविताला धोका सुद्धा हे लोक पान २ वर...

